cmyk

## संपादकीय

### दुसऱ्या राष्ट्रप्रमुखांची गळाभेट घेतल्याने पत वाढत नाही !

आंतरराष्ट्रीय समुदाय सध्या पाकिस्तानवर फारच मेहरबान झाल्याचे दिसत आहे. मागच्या आठवड्यातल्या या संदर्भातल्या दोन बातम्या तर भारतासाठी धक्कादायक ठरल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी समितीच्या उपाध्यक्षपदावर पाकिस्तानची नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्याच वेळेस संयुक्त राष्ट्रांच्या तालिबान विरोधातील समितीचे प्रमुखपदही पाकिस्तानला देण्यात आले आहे. या दोन्ही बातम्या भारतासाठी धक्कादायक अशासाठी ठरल्या आहेत


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### पहलगाम हल्ला केंद्राच्या हलगर्जीचा परिणाम–ममता बॅनर्जी

कोलकात्ताः पहलगाम दहशतवादी हल्ला हा केंद्राच्या निष्काळजीपणाचा परिणाम होता. दहशतवादी हल्ल्याच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी का नव्हते? असा प्रश्न मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोदी सरकारला विचारला आहे. मंगळवारी पश्चिम बंगाल विधानसभेत सशस्त्र दलांचे कौतुक करणारा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री ममता यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. ममता पुढे म्हणाल्या की, भाजप सशस्त्र दलांच्या शौर्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे, देशातील जनतेला सुरक्षा देण्यात अपयशी ठरल्यामुळे भाजप सरकारने सत्ता सोडली पाहिजे. त्यात पंतप्रधान मोदी फक्त स्वतःची जाहिरात करण्यात व्यस्त आहेत, असेही त्यांनी म्हटले.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–४८ | बुधवार, दि.११ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### सरकारने राष्ट्रीय सुरक्षा वर्तुळ कडक केले –संरक्षण मंत्री

नवी दिल्ली–संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, गेल्या अकरा वर्षांत, अंतर्गत सुरक्षेबाबत असो किंवा बाह्य शत्रूंपासून सुरक्षेबाबत असो, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आमच्या सरकारने राष्ट्रीय सुरक्षा वर्तुळ मजबूत आणि कडक केले आहे. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रत्येक मुद्द्यावर आम्ही सरकारचा दृष्टिकोन आणि कृतीची पद्धत दोन्ही बदलली आहे.

### पूर व्यवस्थापनासंदर्भात केंद्र सरकार आग्रही

नवी दिल्ली–केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली येथे देशातील पूर व्यवस्थापन तयारीचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यांनी देशातील पुराचा धोका कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचा आढावाही घेतला.

### पत्नीसोबत पतीनेही केली वडाची पूजा

परळी : सात जन्म हाच पती मिळावा असे म्हणत आजचा वट सावित्री पौर्णिमेला महिला वडाच्या झाडाच पूजन करतात. मंगळवारी गावाखेड्यात शहरामध्ये हा सण महिला मोठया उत्सहात साजरा करत आहेत. मात्र परळीत ऐश्वर्य व विद्या शिरसाट या जोडप्याने एकत्र वट वृक्षाचे पूजन करत पुढील सात जन्म हीच पती–पत्नी मिळावी यासाठी वडाची पूजा केली आहे.

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू आक्रमक

अमरावती–शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून अमरावतीच्या गुरुकुंज मोझरीत बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. आज पहिल्यांदा प्रशासनाकडून कडू यांच्या आंदोलनाची दखल घेण्यात आली आहे. उपविभागीय महसूल अधिकारी पी. एन. मिन्नू व तिवसा तहसीलदार मयूर कडसे बच्चू कडू यांच्या आंदोलन स्थळी दाखल झाले आहेत. बच्चू कडू यांच्या प्रकृतीबाबत प्रशासनाने पहिल्यांदाच विचारपूस केली.

### संपलेल्या माणसांना मला संजीवनी द्यायची नाही– राणे

मुंबईः मला त्यांच्या कुठल्याच प्रश्नाला उत्तर द्यायचे नाही. मी त्यांना अनेक वर्ष ओळखत आहे. संपलेल्या माणसांना मला संजीवनी द्यायची नाही. त्यांच्यात काय दम आहे ते मी पाहिले. ते ठाकरे यांची बाजू लावून धरतात की नाही मला नाहीत नाही, असे नारायण राणे यांनी म्हटले आहे.

### लक्ष्मण हाके यांचा अजितदादांवर पुन्हा हल्ला

मुंबई–राष्ट्रवादीला धनगर समाजाचे एवढे पित्त का आहे असा सवाल हाके यांनी केला आहे. महाराष्ट्रातल्या दलित चळवळी कोणी फोडल्या? कामगार चळवळी कशा संपवल्या? शेतकरी संघटनेचे तुकडे कोणी केले? ऊसतोड मजुरांचे शोषण कोणी केले? असे सवाल लक्ष्मण हाके यांनी फेसबुक पोस्टद्वारे केले आहेत.

### निधी कापला नाहीतर वाढवला– अजित पवार

मुंबई : आपण आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचे आरोप खोटे असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी म्हटले आहे. आदिवासी, सामाजिक विभागाचा निधी आपण वळवला नसून गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक निधी दिल्याचेही अजित पवार म्हणाले. पुण्यातील राष्ट्रवादीच्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. कुणाचाही निधी कमी केला नाही, असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांना टोला लगावला आहे.

### नारायण राणेंनी धमकी दिली – प्रकाश महाजन

संभाजीनगर : खासदार नारायण राणेंनी धमकी दिल्याचा आरोप मनसे नेते प्रकाश महाजन यांनी केला. राणेंच्या कार्यकर्त्यांकडूनही शिवीगाळ आणि धमकी दिली जात असल्याचा आरोपही महाजन यांनी केला आहे. काही बरं वाईट झाल्यास नारायण राणे जबाबदार राहितील असेही महाजन यांनी म्हटले आहे.

### लाडक्या बहिणींचे उत्पन्न कळणार, आयकर देणार डेटा

मुंबई : लाडक्या बहिणींचे उत्पन्न किती ते आता कळणार आहे. कारण आयकर विभाग लाभार्थी महिलांची माहिती उपलब्ध करुन देणार आहे. त्यामुळे आयकर भरणाऱ्या लाडक्या बहिणींना दीड हजाराचा लाभ मिळणार नाही. कारण महिला बालविकास विभाग आयकरच्या डेटाचा वापर करून आयकर भरणाऱ्या महिलांची यादी तयार करून त्यांना मिळणारा लाभ बंद करणार आहे.

# पेरणीची घाई नको!

## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन,१५ जून नंतरच मोसमी पाऊस; मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदींचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'राज्यातील सर्व भागात १५ जून पासून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पान २ वर

**मोसमी पाऊस तीन – चार दिवसांत सक्रिय**

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात बारा जून रोजी मराठवाड्यातील काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे बारा आणि पंधरा जून दरम्यान मुसळधार तर १३,१४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत ५० टक्के महिलांना निवडूण आणा

### शरद पवार यांचे आवाहन, पक्षाच्या २६ च्या वर्धापनदिनी कार्यकर्त्यांचे मानले आभार



**पुणे । प्रतिनिधी**

**दोन–तीन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यात ५० टक्के महिलांना संधी द्या, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात शरद पवार मार्गदर्शन करताना बोलत होते.**

शरद पवार म्हणाले की, मुलींना संधी मिळाल्यानंतर त्यांनी जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम केले. अगदी सैन्य दलातही ते दिसून आले. ऑपरेशन सिंदूरबाबत दोन महिलांनी माहिती देऊन हे सिद्ध केले. भगिनींना संधी मिळाली तर त्याही कर्तृत्व दाखवू शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. आता जिल्हा परिषद, मनपा निवडणुका आल्यात. येथे पन्नास टक्के महिलांना संधी मिळाली तर त्याही कर्तृत्व दाखवतील. महिलांना उमेदवारी देण्याचा निर्णय आपल्याला यशस्वी करायचा आहे. पक्षात फूट पडेल असे वाटत नव्हते, पण पडली. विचारात अंतर पडले त्यामुळे फूट पडली. जे राहिले ते विचाराने राहिले. आता तेच विचार घेऊन जनतेला साथ देण्यासाठी राहिले. उद्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वेगळे चित्र दिसेल. चिंता करू नका. कोण गेले याची चिंता करू नका. एकसंध रहा, जनतेशी बांधिलकी कायम ठेवा काहीच अडचण येणार नाही. आता पुढील तीन महिने पान २ वर



### राज्यात वाढणार मद्याचे दर, मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील मद्यप्रेमींसाठी महत्वाची बातमी असून राज्य सरकाने मद्यावरील उत्पादन शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील तिजोरीत १४ हजार कोटीच्या महसूलाची वाढ होणार आहे. पण त्याचवेळी मद्यप्रेमींच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे.**

पान २ वर

## तंत्रज्ञान ही दुधारी तलवार ती न्यायालयीन कामासाठी वापरा – सरन्यायाधीश भूषण गवई



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**तंत्रज्ञान ही दुधारी तलवारीसारखी आहे. निर्णय प्रक्रियेची जागा घेण्यासाठी नाही तर न्यायालयीन कामकाज सुधारण्यासाठी वापरली पाहिजे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले आहे. सोमवारी केंब्रिज विद्यापीठात 'न्याय उपलब्धतेमध्ये तंत्रज्ञानाची भूमिका' या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.**

भारतासारख्या मोठ्या आणि विविध देशात न्याय मिळवण्यास सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञान खूप मोठी भूमिका बजावू शकते असे ते म्हणाले. भारतीय न्यायव्यवस्थेने तंत्रज्ञानाचा वेगाने स्वीकार पान २ वर

## माझ्यावर हल्ला झाल्यास अजित पवार जबाबदार

### राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून धमक्या, लक्ष्मण हाकेंचा संताप

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या धमक्यांवरून ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा थेट इशाराच दिला आहे.

ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादीतील वाकयुद्ध सुरुच असून गेल्या काही दिवसांपासून लक्ष्मण हाके चर्चेत आहेत. आंदोलक



लक्ष्मण हाके यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. अजित पवार यांनी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचे सांगत गंभीर आरोपही केले होते. पान २ वर

## मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची बदली



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची बदली झाली असून, त्यांची नियुक्ती छत्रपती संभाजीनगर येथे म्हाडाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगनंथम एम. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले पान २ वर

## सरकारचे टेन्शन वाढणार!

### मनोज जरांगेंनी दिला बच्चू कडूंच्या आंदोलनाला पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्याकडून सध्या बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते सध्या हे आंदोलन करत आहेत. काही झाले तरी मी अन्नाचा एकही कण घेणार नाही, असे बच्चू कडू यांनी यापूर्वीच जाहीर केले होते. आता या आंदोलनाला पाठिंबा मिळताना दिसत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनीदेखील आता बच्चू कडूंच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. जरांगे यांच्या या पाठिंब्यामुळे आंदोलनाची पान २ वर

## साखर कारखाना, पॉवर ग्रिडमधील साहित्य चोरणारी टोळी पकडली

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक, बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चोरीच्या घटना होत असल्याने चोरी करणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने साखर कारखाना आणि पॉवर ग्रिड मधील साहित्य चोरणारी टोळी पकडली आहे. ही कारवाई मंगळवारी करण्यात आली.

तस्थानिक गुन्हे शाखेने पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर दाखल गुन्हयातील मौजे शेपवाडी येथील पॉवरग्रीड येथील १२,९५,०००/–किमतीचे अॅल्युमिनीयमचे साहीत्य चोरीस गेलेले होते व परळी वैजनाथ येथील साखर कारखाण्यामधील ६०,०००/–किमतीचे पितळी साहित्य चोरी गेले होते. या गुन्हयांचा तांत्रिक विश्लेषन व समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, आरोपी नामे शेख जावेद शेख हबीब व त्याचे साथीदार तसेच बंडु लक्ष्मण जोगदंड व त्याचे साथीदार या दोन्ही टोळयांनी चोरले आहे. त्या टोळी मधील आरोपी परळी येथे आहेत त्यावरुन लागलीच पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांची टिम आरोपी शोध कामी परळी येथे रवाना केली. तेथे जावुन टिमने आरोपीचा शोध घेतला असता मोठ्या शिताफीने यातील आरोपी शेख जावेद हबीब, (वय ३९ वर्ष, रा. बरकर नगर परळी वै. जि. बीड), बंडु लक्ष्मण जोगदंड, (वय ५० वर्ष,



रा. रुमना जवळा ता. गंगाखेड, जि. परभणी ह. मु शिवाजीनगर परळी वै. ), विजय नारायण जोगदंड,( वय ४२ वर्ष, रा. भिमनगर परळी वै जि. बीड), शेख अब्दुल रौफ ईस्माईल, पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६७.०० क्विंटल | २,३८६ | २,८२२ | २,५८३ |
| ज्वारी/हायब्रिड : ७६.५० क्विंटल | २,००० | ३,३४० | २,३९५ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : ४९.५० क्विंटल | ६,१७० | ६,४३१ | ६,३६५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी:१६६.५० क्विंटल | १,८८० | २,५७० | २,२७८ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,२४० | ५,३५० | ५,३०३ |

cmyk

अग्रलेख

# दुसऱ्या राष्ट्रप्रमुखांची गळाभेट घेतल्याने पत वाढत नाही !

आंतरराष्ट्रीय समुदाय सध्या पाकिस्तानवर फारच मेहरबान झाल्याचे दिसत आहे. मागच्या आठवड्यातल्या या संदर्भातल्या दोन बातम्या तर भारतासाठी धक्कादायक ठरल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी समितीच्या उपाध्यक्षपदावर पाकिस्तानची नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्याच वेळेस संयुक्त राष्ट्रांच्या तालिबान विरोधातील समितीचे प्रमुखपदही पाकिस्तानला देण्यात आले आहे. या दोन्ही बातम्या भारतासाठी धक्कादायक अशासाठी ठरल्या आहेत की, भारतीय खासदारांची सात शिष्टमंडळे जगभरातल्या विविध देशांमध्ये पाकिस्तान कसा दहशतवादाला आश्रय देतो हे त्यांना पटवून देण्यासाठी तिकडे गेली होती, त्यांचे हे दौरे सुरू असतानाच संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधातील महत्त्वाच्या समितीचे उपाध्यक्षपद पाकिस्तानला दिले गेले आहे.

एक वेळ तालिबानच्या विरोधातील समितीचे अध्यक्षपद पाकिस्तानला दिले जाण्याची बाब आपण समजू शकतो. कारण, पाकिस्तान हा तालिबानची राजवट असलेल्या अफगाणिस्तानच्या शेजारचा देश आहे आणि खुद्द पाकिस्तानात अनेक तालिबान गनिमांनी आश्रय घेतलेला आहे. त्यामुळे पाकिस्तानला मिळालेल्या या अध्यक्षपदाविषयी फार आक्षेप घेता येणार नाही; पण संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने जगभरातल्या दहशतवादाच्या विरोधात जी एक समिति नेमली आहे त्या समितीचे उपाध्यक्षपद पाकिस्तानला दिले जाणे ही बाब मात्र गंभीर आहे. मुद्दाम भारताला खिजवण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला ही बक्षिसी देऊ केली आहे काय, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जगातल्या अनेक देशांनी निषेध केला. हा दहशतवादी हल्ला पाकिस्तान पुरस्कृत होता हे बहुतेक जगाला मान्य असताना दहशतवादाच्या विरोधातील उपाययोजनेची जबाबदारी पाकिस्तानवरच सोपवणे हे कोणत्या गणितात बसते हे समजत नाही. भारत आणि पाकिस्तान यांच्यात अलीकडेच जे संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आणि प्रत्यक्ष त्यांच्यात चकमक झाली त्यावेळी संपूर्ण जग भारताच्या पाठीशी उभे राहून पाकिस्तानला विरोध करेल अशी अपेक्षा होती, पण येथे मात्र वेगळेच चित्र निर्माण झाले आहे.

आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पाकिस्तानवर मेहरबानी करण्याच्या एकामागून एक घटना घडल्या आहेत. पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताचा विरोध डावलून पाकिस्तानला आर्थिक मदत दिली, त्यापाठोपाठ जागतिक बँक आणि आशियाई विकास बँक या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनीही पाकिस्तानला मदतीचा हात दिला. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धसदृश स्थिती निर्माण झाल्यानंतर चीन, तुर्कस्तान, अझरबैझान अशा देशांनी अधिकृतपणे भारताच्या विरोधात पाकिस्तानला पाठिंबा दिला. पाकिस्तानातील नागरिकांना कुवेतमध्ये रोजगारासाठी गेली २० वर्षे व्हिसा दिला जात नव्हता. मात्र, याच कालावधीत कुवेतने ही बंदी उठवून पाकिस्तानी मजुरांना तेथे कामासाठी प्रवेश करण्याची अनुमती दिली. रशियानेही याच काळात पाकिस्तानशी व्यावसायिक करार केले. जगातले हे सगळे देश नेमके याच वेळी पाकिस्तानच्या पाठीशी कसे काय उभे राहिले याचे गूढ निर्माण झाले आहे. दहशतवादाला आश्रय देणारा पाकिस्तान एकेकाळी जगात एकटा पडलेला असताना, आज मात्र साऱ्या जगाला त्याचा कळवळा येत आहे आणि जगात शांतिदूत म्हणून नाव असलेल्या भारताला मात्र आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मुद्दाम खिजवले जात आहे, हे लक्षण भारतासाठी ठीक नाही. खरे पाहता भारतच आज आंतरराष्ट्रीय पातळीवर एकटा पडला आहे की काय असे चित्र निर्माण होत आहे. ते चित्र संपूर्ण देशासाठी चिंताजनक आहे. या चिंतेची काळजी आता मोदी सरकारने समर्थपणे वाहण्याची गरज आहे. पंतप्रधान मोदी यांनी आजवर जवळपास सर्व जगातील देशांना भेटी देऊन त्या देशांचे भारताशी चांगले संबंध राहतील असे प्रयत्न केले, किंबहुना मोदींमुळे भारताची जगात शान वाढली असे चित्र भारतीय जनता पक्षाने निर्माण केले. पण आज पाकिस्तान विरोधातल्या युद्धात जगातला एकही देश भारताबरोबर नाही ही विदारक वस्तुस्थिती आपल्या एकूणच परराष्ट्र धोरणाविषयी साशंकता निर्माण करणारी ठरली आहे, हे अपयश नेमके कोणाचे हेही आता निश्चित करण्याची गरज आहे किंबहुना भारताची जागतिक पातळीवर सध्याची पत घसरली आहे ती सुधारण्यासाठी आता आपल्याला परराष्ट्र धोरणाचाही फेरविचार करण्याची वेळ आली आहे. मुळात आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानवर सध्या जी मेहरबानी चालवली आहे ती नेमकी कसली बक्षिसी आहे, असा सवाल भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उपस्थित करायला हवा आहे.

जगात भारताची पत वाढवणे म्हणजे केवळ वारंवार विदेशांना भेटी देणे आणि तेथील राष्ट्रप्रमुखांची गळाभेट घेणे एवढेच नसते हा मुद्दाही आता लक्षात घ्यावा लागेल. देशांतर्गत कारभारात केंद्र सरकार किती जबाबदारीने वागते, देशात लोकशाही मूल्यांची किती बुज राखली जाते, तसेच देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य याला किती महत्त्व दिले जाते यावरून जग आपल्या देशाची किंमत करत असते. या पातळीवरसुद्धा मोदी सरकारने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून देशाची प्रतिमा कायम टिकवायला हवी आहे.

# ५ लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्यांना कदापि माफ करणार नाही-आ.लोणीकर

जालना । प्रतिनिधी

**परतूर, मंठा व जालना तालुक्यातील १७३ गांवे व मंठा तालुक्यातील ९५ गांवे ग्रीड पाणी या योजनेअंतर्गत सर्व गावांना पाणी पुरवठा सुरु झालेला नसतानाही कामाचे निविदेनुसार अंतिमीकरण करून योजनेचे लेखेजोखे बंद करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सदर अनियमितते प्रकरणी प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर बी गाढे, श्री. एम. बी. गायकवाड, शाखा अभियंता तथा तत्कालीन उप अभियंता (प्रभारी), श्री एस एस पटेल प्रभारी उपकार्यकारी अभियंता मजीप्रा उपविभाग, मंठा, परतूर यांचे निलंबन करण्यात आले असून रीटायर झालेले उप अभियंता श्री दांडगे व गाझी यांच्यासह इतर अधिकारी, यांचेविरुध्द दोषारोप बजावून विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे. असे असले तरी जोपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही तसेच परतूर विधानसभा मतदारसंघातील ५ लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला कदापि माफ करणार नाही अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.**

भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित केल्यामुळे माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण व प्रचंड पाठपुराव्याला मोठे यश आले असून या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सदस्य सचिव व प्रधान सचिव यांच्या विरोधात आमदार बबनराव लोणीकर यांनी महामहीम राज्यपाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार करत प्रधान सचिव व सदस्य सचिव हे या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असून या सर्व प्रकारांमध्ये हे देखील सहभागी असल्याचे शक्यता वर्तवली होती त्यानुसार प्रशासन तात्काळ अलर्ट मोडवर आले असून भ्रष्ट व दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येत असल्याचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव रवींद्रन यांनी काढले आहेत. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या दि.३१.१२.२०२४ व दि.०३.०१.२०२५ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या मुख्या अभियंता श्रीमती मनिषा पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून समितीने दि.१४.०१.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार अनियमिततेस जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम ८ व १२ अंतर्गत मध्यवर्ती कार्यालयाच्या दि. २५.०४.२०२५ च्या ज्ञापनान्वये प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर बी गाढे, श्री. एम. बी. गायकवाड, शाखा अभियंता तथा तत्कालीन उप अभियंता (प्रभारी), श्री एस एस पटेल प्रभारी उपकार्यकारी अभियंता मजीप्रा उपविभाग, मंठा, परतूर व इतर ५ अधिकारी यांना दोषारोप बजावून एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीडचे संपूर्ण बिल अदा करण्यात आले त्यावेळी ५२ गावात पाणी पोहोचलेलेच नव्हते ते आजही आजच्या तारखेत पोहोचलेले नाही. तसेच दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड चे संपूर्ण बील अदा करण्यात आले, त्या तारखेपर्यंत एकही गावात पाणी पोहोचलेले नव्हते. असे असताना अधिकाऱ्यांनी मात्र संबंधित कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक व्यवहार करत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याचा खोटा अहवाल सादर केला आहे. मुख्य अभियंता लोलापाड, अधीक्षक अभियंता कोळी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने आर्थिक व्यवहार करून शासनाला खोटा अहवाल तर सादर केला आहे परंतु आपण वारंवार केलेल्या सूचनेचे व आदेशाची देखील अवहेलना केली आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर ०३ वर्षे संबंधित कंत्राटदाराने सदरील योजना चालवायची आहे त्यानंतरच कंत्राटदराला पूर्ण बिल देणे अपेक्षित आहे, तसा करार व नियम आहे. असे असताना १७६ गाव वॉटर ग्रीड अंतर्गत ५२ गावांमध्ये व ९५ गाव वॉटर ग्रीड मधील सर्व गावांमध्ये पाणी पोहोचलेले नसताना संपूर्ण बिल अदा करण्यात आले अशा बेजबाबदार हलगर्जीपणा करणाऱ्या व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना कदापी माफ करणार नाही असेही आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले.

## तहसीलदाराने आदेश काढताच शिवरस्ता झाला मोकळा



अंबड । प्रतिनिधी

**अंबड तालुक्यातील महाकाळ शहागड वाळकेश्वर या ३३ फुटांच्या गाव शेत शिवाराच्या सत्याच्या कामाला शेतीचा शिवरस्ता करण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. हा रास्ता बाळकेश्वर गावाच्या शहागड वाळकेश्वर शिलपर्यंत जातो.**

शेतक-यांनी जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्याकडे या रस्त्याची वाट मोकळी करून देण्याची मागणी केलेली होती. शहागड गावात शिव सत्यावर अतिक्रमण झाल्याने ज्या गावकऱ्यांना व शेतकयांना रस्ता नचाता अशांना शेतांमध्ये जाण्या मोजणी खोदा पालण्यात येत असला कडेला असलेल्या शेतकयांनी तहसीलदार यांच्याकडे धाव घेतलेली आसतांना शासन निर्णय अनुसार शासनाचा शिवरस्ता असल्याने तसेच पाणंद व मागेल त्याला शेतरस्ता या युक्ती प्रमाणे शिव रस्त्याच्या मोजणीला तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशाने शहागड सजाचे तलाठी सचिन बागुल, भूमापन उपअधीक्षक पी. आर. मुंडे, भूमापक ए. एन. सरोदे भूमापक, पोरिक्स उपनिरीक्षक बालाजी पद्यणे, जमादार रामदास केंडे, पो.का. बाळासाहेब मांडलिक, दोन पोलिस कर्मचारी व दहा आरसीबीचे पोलिस कर्मचारी यांचा बंदोबस्त तैनात होता, यावेळी या भागातील शेतकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ४६ वाहनावर कारवाई

जालना । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व तहसीलदार तथा उपविभागी अधिकारी विजय चव्हाण यांच्या आदेशावरून जालना उप प्रादेशिक कार्यालयामार्फत जालना जिल्ह्यात विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये अवैध गौण खनिज वाळू वाहतूक करणाऱ्या नोंदणी क्रमांक प्रदर्शित न केलेल्या (विना नंबर प्लेट) एकुण ४६ वाहनांवर वायुवेग पथकाने कारवाई केली असून त्यापैकी २३ वाहने अटकावून ठेवण्यात आली आहेत. जिल्ह्यात अवैध वाहतूक रोखण्यासाठी आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली आहे. अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी दिली आहे.

वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक जिल्ह्यातील वाहन चालक, मालकांनी आपल्या वाहनावर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट ही नवीनतम तंत्रज्ञानावर आधारित असून वाहनांच्या सुरक्षिततेसाठी तसेच गैरवापर रोखण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे वाहन चोरी, नकली नंबर प्लेट आणि नियमांचे उल्लंघन होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने हाय सिक्युरिटी नंबर प्लेट ची अंमलबजावणी करण्यात आली आहे. याकरिता प्रत्येक वाहनचालक, मालकांनी आपल्या वाहनाची अधिकृत नोंदणी करून हाय सिक्युरिटी नंबर प्लेट वाहनावर लावून वाहन सुरक्षितता आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व नागरिकांनी यामध्ये सहकार्य करून अधिकृत हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवून वाहन रस्त्यावर चालवावे आणि नोंदणी क्रमांक प्रदर्शित न केलेल्या (विना नंबर प्लेट) रस्त्यावर चालवू नये. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा व केंद्रीय मोटार वाहन नियम यातील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येईल.

## जिल्ह्यात १८ न्यायिक अधिकारी रुजु

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा व सत्र न्यायालयात तिन, जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात - मुख्य न्यायदंडाधिकारी,पाच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश,दोन कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश, अंबड तालुका दिवाणी न्यायालयात कनिष्ठ स्तर दोन, भोकरदन तालुका न्यायालयात कनिष्ठ स्तर दोन, जाफराबाद तालुका न्यायालयात कनिष्ठ स्तर एक,परतुर तालुका न्यायालयात कनिष्ठ स्तर दोन असे एकूण १८ न्यायिक अधिकारी हे दि.०८ जून रोजी रुजू झाले अशी माहिती ॲड.अरविंद एस. मुरमे यांनी दिली आहे . प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा एम. मोहिते यांनी दि.२३/०५/२५ रोजी चे कार्यालयीन आदेशानुसार जालना जिल्हा व सत्र न्यायालयात क्रमांक दोन चे जिल्हा न्यायाधीश आर.आर.राठी, क्रमांक तिन चे जिल्हा न्यायाधीश श्रीमती एन. एस. शेख, तदर्थ एक जिल्हा न्यायाधीश श्रीमती के. के.शाह.जालना तालुका न्यायालयात मुख्य न्यायदंडाधिकारी पदी जी.आर.ढेपे, वरीष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. पी. दिवाण,दुसरे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस. एम. पडोळीकर, तिसरे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती ए. आर. नागोरी, चौथे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती पी. डी. तारु, पाचव्या वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस के दुगांवकर, कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती रुहिना अंजुम मोहम्मद युनुस, कनिष्ठ स्तर तिसरे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस. एन. पुंड , अंबड तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात दुसरे कनिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस.एच.राठी व तिसरे वरिष्ठ कनिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस. एस.परिहार, भोकरदन तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी न्यायाधीश एस.एस.काळे व कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश तथा सह प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी न्यायाधीश श्रीमती एम.डी.दाजुका,जाफराबाद तालुका न्यायालयात कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायाधीश ए.एन.खताडे,परतुर तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी न्यायाधीश श्रीमती व्हि.बी.डोंबे व कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश तथा सह प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी न्यायाधीश श्रीमती ए.बी.राऊत आदिंची नावे आज जालना जिल्हा व तालुकास्तरावर रुजू हाणारे न्यायिक अधिकारी म्हणून समावेश आहे असेही ॲड. अरविंद एस. मुरमे यांनी कळविले आहे.

## पान १ वरून...

### पेरण्यांची घाइ

पावसाची मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी ही माहिती दिली.

------------

### राज्यात वाढणार मद्याचे

मंगळवारी झालेल्या राज्यमंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या प्रमूख निर्णयामध्ये शासनाचा महसूल वाढवण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने मद्यावरील शुल्क वाढविले आहे. यामध्ये भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर दीड टक्याने वाढ करण्यात आली आहे. तर यापुढे १८० मिली मद्य किरकोळ विक्रीची किंमत प्रत्येक ब्रँडनुसार वेगळी होणार आहे. यामध्ये देशी मद्य ८० रुपये होणार आहे तर महाराष्ट्रात तयार होणारे लिकर १४८ रुपये, तसेच भारतीय बनावटीचे विदेशी मद्य २०५ रुपये, विदेशी मद्याचे प्रमीयम ब्रॅण्ड ३६० रुपये अशी किमान विक्री किंमत राहणार आहे. यामध्ये प्रत्येक ब्रँडनुसार किंमतीमध्ये फरक पडणार आहे. मद्याच्या किंमतीबरोबर उत्पादन वाढवण्यासाठी सीलबंद विदेशी मद्य विक्री हॉटेल आणि रेस्टॉरंट कराराद्वारे भाडेतत्त्वावरती चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. यावर दहा ते पंधरा टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच विभागाला बळकटी देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागात १२२३ पद नव्याने भरण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यासह राज्य उत्पादन शुल्क विभाग अंतर्गत मुंबई शहर आणि उपनगर यासाठी नव्याने विभागीय कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे आता मद्यप्रेमींना मद्य विकत घेताना अधिकचे पैसे मोजण्याची तयारी ठेवावी लागणार आहे.

-------------

### स्थानिक स्वराज्य संस्थाच्या

फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विचार करा, असे आवाहन करत ५० महिलांना निवडून आणा असे आवाहनही पवार यांनी यावेळी केले. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, राष्ट्रवादीच्या लोकांना जनतेने संधी दिली. अनेक पदे मिळाली. यातून लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली. तुमच्यातील अनेक सहकारी कधी सत्तेत नव्हते. पण त्याना संधी मिळाली त्यातून एक संदेश दिला की प्रशासन चालवायला सामान्य कुटुंबातल्या प्रमाणिक कार्यकर्त्याला संधी मिळाल्यानंतर तोही कर्तृत्व दाखवू शकतो. राज्य चालवू शकतो. तुमच्यातला सामान्य कार्यकर्ता म्हणून ज्यांनी कष्ट केले पण ते आज नाहीत. आर. आर पाटील हे सामान्य कुटुंबातले होते. हा कोण मुलगा. मला सांगण्यात आले त्यांचे नाव आर. आर. पाटील मी चर्चा केली. माझ्या लक्षात आले त्यांच्यात कर्तृत्व आहे. नंतर त्यांना संधी मिळत गेली. निवडणुकीत सत्ता मिळाली. ग्रामविकास खाते नंतर उपमुख्यमंत्री, गृहमंत्री म्हणून काम केले. त्यांचे अनेक निर्णय जनतेला भावले. यातून राष्ट्रवादी सामान्यांना संधी देते असा संदेश गेला. यातून तुम्हा सगळ्यांच्या कष्टातून, बांधिलकीतून पक्षाची प्रतिष्ठा वाढल्याचे पवार यांनी सांगितले. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले, १९८० मध्ये सत्ता गेली निवडणुका आल्या ५० ते ५२ निवडून आले. पण नंतर फक्त ६ शिल्लक राहिले. त्यातील आजही एक येथे आहेत. आमचा पक्ष सहा जणांचा झाला. त्यानंतरच्या निवडणुकीत राष्ट्रवादीची संख्या ७२ झाली. त्यामुळे चिंता करू नका. कोण गेलं याची चिंता करू नका. एकसंध रहा जनतेशी बांधिलकी कायम ठेवा काहीच अडचण येणार नाही. एका लहानशा घरात. एका खोलीत राहणारा, रात्री दोन वाजेपर्यंत लोकांचे काम करणारा कार्यकर्ता म्हणून निलेश लंके यांच्याकडे पाहिले जाते. हाच राष्ट्रवादीचा ठेवा. याचा विचार करा. सत्ता आपोआप येईल. ती येण्याची शक्यता आता मला दिसते आहे असेही यावेळी पवार म्हणाले.

------------

### माझ्यावर हल्ला झाल्यास

त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व आमदारांनी लक्ष्मण हाकेंवर पलटवार केला. आमदार अमोल मिटकरी यांनी काही शब्दप्रयोग करत हाकेंना लक्ष्य केले आहे. दरम्यान, आजही त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर निशाणा साधला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापन दिन आहे. यातच आता लक्ष्मण हाके यांनी एक पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. या पोस्टची चर्चा असतानाच राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या धमक्यांवरून ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा थेट इशाराच दिला आहे.

------------

### तंत्रज्ञान ही दुधारी तलवार ती न्यायालयीन

केला आहे जेणेकरून अधिकाधिक लोकांना न्याय मिळू शकेल. न्या. गवई म्हणाले, आपल्याला हे देखील स्वीकारावे लागेल की तंत्रज्ञान दुधारी तलवार म्हणून काम करू शकते, ज्यामुळे असमानता आणखी वाढू शकते. एक मोठी चिंता म्हणजे 'डिजिटल डिव्हिडंट', जिथे ज्यांना आधीच न्याय मिळण्यात अडचणी येत आहेत ते इंटरनेट, उपकरणे आणि डिजिटल ज्ञानाच्या समान प्रवेशाअभावी मागे राहू शकतात. जर तंत्रज्ञानाचा खऱ्या अर्थाने न्यायासाठी वापर करायचा असेल, तर समता आणि समावेश हा त्याच्या नियोजनाचा आधार असला पाहिजे. न्या. गवई म्हणाले की धोरणात्मक हस्तक्षेपाशिवाय न्याय वितरण व्यवस्थेत कोणतीही क्रांती घडवून आणता येणार नाही. तंत्रज्ञानावर आधारित मध्यस्थी निर्णयांसाठी मानवी देखरेख, अल्गोरिदमिक पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणारी एक प्रशासन चौकट विकसित केली पाहिजे.

-------------

### सरकारचे टेन्शन

धार येणार असून, सरकारचे टेन्शनही वाढणार आहे. बच्चू कडू यांचे अमरावतीच्या गुरुकुंज मोझरीमधील तुकडोजी महाराजांच्या समाधी परिसरात हे अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. त्यांनी सरकारकडे शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या याच मागणीला मनोज जरांगे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. मनोज जरांगे आंदोलनस्थळी बुधवारी (११ जून) दुपारी ४ वाजता बच्चू कडू यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे आता या दोन्ही नेत्यांच्या भेटीकडे सगळ्यांकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांनी पाठिंबा दिल्यामुळे बच्चू कडू यांच्या आंदोलनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. मनोज जरांगे आंदोलनस्थळी नेमकी काय भूमिका मांडणार? हे पाहणे महत्वाचे असणार आहे. तसेच बच्चू कडू यांची खालवत चाललेली प्रकृती लक्षात घेता राज्य सरकार त्यांच्या मागणीसंदर्भात काय निर्णय घेते? हे पाहणे देखील महत्वाचे असणार आहे.

-------------

### मुख्य कार्यकारी अधिकारी

असून, यामध्ये वरिष्ठ आयएएस अधिकारी नितीन पाटील यांची महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी तर आप्पासाहेब धुळाज यांची ओबीसी बहुजन कल्याण विभागाच्या सचिव पदी नियुक्ती केली आहे. बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जिवने यांची बीड येथून छत्रपती संभाजी नगर म्हाडाचे सह व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या जागी गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगनंथम एम. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

-------------

### साखर कारखाना, पॉवर ग्रिडमधील

( वय ४५ वर्ष, रा. जुना रेल्वे स्टेशन परळी वै जि.बीड ), प्रेम रावसाहेब वाघमारे, (वय १९ वर्ष, रा. नागसेननगर परळी वै जि.बीड), संतोष सोपान कांबळे, (वय ३० वर्ष, रा मिलींदनगर परळी वै जि. बीड) यांना ताब्यात घेवुन पुढील तपासकामी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले. यावेळी त्याचे कडुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व परळी ग्रामीण असे चोरीचे दोन गुन्हे उघड करण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. यातील चोरीस गेलेले अॅल्युमिनीयम साहीत्य कोणास विकले, कोणाकडे आहे याचा संयुक्तरित्या शोध पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व स्थानिक गुन्हे शाखा बीड हे घेत आहेत. सदरील कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनित कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, नितीन वडमारे व सचिन आंधळे, विकी सुरवसे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे. पॉवरग्रीड व कारखाण्यामधील सामान चोरणारी टोळी पकडल्याने चोरीवर आळा बसणार आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ११ जून २०२५



## पिंपळनेर येथील अजय काळे यांची डर्बन येथील मॅरेथॉन स्पर्धेत चमकदार कामगिरी




बीड । प्रतिनिधी

अजय नामदेवराव काळे, हे राहणार पिंपळनेर तालुका जिल्हा बीड येथील मूळ रहिवासी आहेत व सध्या पुणे येथे स्थायिक आहेत. यांनी दिनांक ०८.०६.२०२५ रविवार रोजी दक्षिण आफ्रिका येथील डर्बन येथे संपन्न झालेल्या जगातील एक अवघड व प्रतिष्ठेची समजली जाणारी कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होत ९० किलोमीटर अंतर दहा तास ३५ मिनिटात पूर्ण केले आहे. जगातील सुमारे ७० देशातील २३ हजार धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. पीटमारीजबर्ग ते डर्बन असा चढउताराचा हा मार्ग पार करताना धावपटूचा कस लागतो. अजयने या स्पर्धेसाठी बरेच वर्ष मेहनत घेऊन हे यश संपादन केले आहे. याबद्दल पिंपळनेर परिसरातील नागरिक, नातेवाईक व मित्रमंडळी यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

# विनाअनुदान शाळा कृती समितीच्या नाशिक-मालेगाव पायीदिंडीची शिक्षणमंत्र्यांनी घेतली दखल

## भुसेंच्या आश्वासनानंतर मालेगाव पायीदिंडी तात्पुरती स्थगित

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित शाळांना अनुदान व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ व १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या शिष्टमंडळाना बोलावून घेत टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समवेत मुंबईत बैठक लावतो असा शब्द शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिल्यामुळे कृती समितीच्या वतीने सध्या नाशिक मालेगाव पायी दिंडी स्थगित करण्यात आल्याचं संघटनेचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. दरम्यान १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषणासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांनी केले.

राज्यातील विनाअनुदानित शाळेच्या अनुदानासाठी व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढी संदर्भातील १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तत्? काळ अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह



इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून घेतले. नाशिक जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती तसेच सर्व समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मालेगाव येथे जाऊन विनाअनुदानित शाळाना टप्पावाढ संदर्भात व १४ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी बाबत सखोल चर्चा केली. तसेच ११ जून पासून नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे नियोजन केले आहे असे शिक्षणमंत्री भुसे यांना सांगितल्यावर ना. दादा भुसे यांनी तुम्ही पायी प्रवास किंवा आत्मक्लेश करून घेऊ नका. लवकरात लवकर तुमचा प्रलंबित विषय संपेल मी मागील बऱ्याच दिवसांपासून निधीसाठी तजवीज कशी होईल हे बघतो आहे. यावर शिष्टमंडळातील काही पदाधिका-यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात निधीची तरतूद करा अशी विनंती केली. यावेळी भुसे यांनी तुमच्या वरिष्ठ पदाधिका-यांना मुंबईला बोलवा मी स्वतः मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांची वेळ घेऊन बैठक लावतो असे आश्वासन दिले. शिक्षण मंत्र्यांनी दिलेला शब्द प्रमाण म्हणून टप्पा वाढीच्या निधी तरतुदीसाठी व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न विषय मार्गी लावण्यासाठी स्वतः शिक्षण मंत्री तयार असल्याने नाशिक ते मालेगाव पायीदिंडी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या समवेत १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे. तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावरआंदोलनासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांच्यासह के के अहिरे, बाळासाहेब ढोबळे, अरुण पवार, अनिलदादा निकम, भारत भामरे, अविनाश चौधरी, शरद शेलार, प्रशांत बचाव, संजय आहेर, बोरसे सर, चव्हाण सर, संजय देवरे सर आदींनी केले आहे.

## मुलां-मुलीप्रमाणेच आपल्या सुनांनाही संधीची उपलब्धी करुन दिली पाहिजे- जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

कॉस्मीक अबॅकस अकॅडमीच्या बक्षीस वितरण समारंभ अंजुमन ईशात ऐ तालमीच्या सचिव खान सबीया बेगम मॅडम, ब्लॉक एज्युकेशन ऑफिसर खान समंदर हमीद, बीड नगर परिषदेच्या मा. सभापती तथा नगरसेविका जयश्रीताई विलास विधाते. यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला या प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक शेख मुख्तार भाई संचालिका तथा शिक्षिका उम्मे हनी मुख्तार शेख यांनी मान्यवरांचा यथोचित सन्मान केला. उम्मे हनी मॅडमने आपल्या प्रास्ताविकात क्लासेसच्या आजवरच्या वाटचालीचा ओघवता आढावा घेतला.

खान समदर हमीद सरांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना आपण सदैव चांगल्याची संगत धरावी तसेच आपल्या सहकारी मित्राला मदतीचा हात देत स्वतः सह समाजाची प्रगती साधावी असे आवाहन केले. विधातेताई यांनी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलातील टॅलेंट ओळखुन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात करीयर घडविण्यासाठी सहकार्य करावे. भेदभाव न करता



मुलांप्रमाणेच मुली आणि सुनांनाही संधीची उपलब्धी करुन द्यावी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन केले. तर सबीया खान मॅडम यांनी उच्च शिक्षण घेऊन सर्वोच्च पदी विराजमान होत आई-वडिल ज्येष्ठ आणि गुरुजनांचा मान राखत आदर्श असे व्यक्तीमत्व घडविले पाहिजे अशी सदिच्छा व्यक्त केली.

मान्यवरांच्या समयोचित भाषणां नंतर यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी मेडल हॅट्स प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले या प्रसंगी विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली. निलकमल हॉटेलच्या सभागृहातील या देखण्या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आयोजक शेख मुख्तार भाई यांनी केले.

### सांगळवाडी-डोळेवाडी-ढिसलेवाडी-दत्तनगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या

## सरपंचपदी सुनंदाताई चेपटे यांची बिनविरोध निवड

रायमोहा । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील व रायमोहा जिल्हा परिषद गटाअंतर्गत येणाऱ्या डोळेवाडी-सांगळवाडी-ढिसलेवाडी-दत्तनगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुनंदाताई हरिराम चेपटे तर उपसरपंचपदी सुनिता अजिनाथ सांगळे यांची दिनांक ९ जून रोजी बिनविरोध निवड करण्यात आली निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून रायमोहाचे मंडळधिकारी एस. यू. सानप यांनी काम पाहिले तर रायमोहा पोलीस चौकीचे सारूक हे बंदोबस्तासाठी हजर होते. सरपंचदी सुनंदाताई हरिराम चेपटे यांची तर उपसरपंचपदी सुनिता अजिनाथ सांगळे यांची निवड



होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली व नवनिर्वाचित सरपंच ,उपसरपंच यांचे हार ,श्रीफळ देऊन पेढा भरून ग्रामपंचायत सदस्य गोरक नवनाथ ढिसले, वंदना सुदर्शन सांगळे, तेजस्विनी बाळकृष्ण ढाकणे, सविता अशोक ढाकणे, सविता अशोक डोळे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या नवनिर्वाचित सरपंच सुनंदाताई हरिराम चेपटे व उपसरपं सुनिता अजिनाथ सांगळे यांना मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार प्रितमताई मुंडे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तात्या तांदळे, माजी जिल्हा परिषद सदस्य वैजिनाथराव मिसाळ,रायमोहा जिल्हा परिषद गटाचे नेते गोकुळभाऊ सानप, रायमोहाकर यांनी शुभेच्छा दिल्या

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे शिक्षक समृध्दी प्रशिक्षण कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

**दि .४ जून २०२५ श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आर्ट ऑफ लिव्हींग आयोजित श्रद्धा कोर्सचा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर सचिव श्री शेख पाशा सर , मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम तसेच शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत गुरुपुजनाचा कार्यक्रम घेवून पार पडला.**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे सर्व शिक्षक वृंदासाठी संस्थेच्या प्रमुखांनी आणि मुख्याध्यापकांनी श्रद्धा कोर्सचे आयोजन केले होते हा कोर्स घेण्यासाठी पुणे येथील शाळेतील शिक्षिका सुप्रिया वाघ मॅडम यांची उपस्थिती लाभली होती. हा कोर्स ४ ते ७ जून २०२५ सकाळी ६.३० ते संध्याकाळी ५ ह्या कालावधीत पार पडला.या कोर्सचे स्वरूप सकाळी पहाटे प्राणायाम ,योगासने ,हरी ओम ध्यान सुदर्शन क्रिया सत्संग विशेष ॲक्टिव्हिटी. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे करता येईल हे या कोर्सचे मुख्य उद्दिष्ट होते .सर्व टीचर्स ने हा कोर्स १००% देऊन केला. या कोर्समध्ये शाळेतील सर्व शिक्षकांना चहा नाश्ता आणि जेवणाची उत्तम सोय शाळेच्या वतीने करण्यात आली शेवटच्या दिवशी समारोप करताना श्रीमती सुप्रिया वाघ मॅडम यांनी स्वतःचे मनोगत व्यक्त करत त्या म्हणाले की,खरोखरच बीडच्या सर्व शिक्षकांमध्ये विशेष गुण आहेत.तसेच अध्यक्ष श्री पारगावकर सर यांनी सर्व शिक्षकांचे तसेच प्रशिक्षक श्रीमती सुप्रिया वाघ मॅडम यांचे विशेष कौतुक केले.श्री पाशा सर यांनी हे सर्व शिक्षकांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सर्वांचे विशेष कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी श्रीमती सुप्रिया वाघ मॅडमचा चा सत्कार पुष्पगुच्छ आणि विशेष भेटवस्तू देऊन केला. हा श्रद्धा कोर्स सर्व शिक्षकांसाठी किती महत्त्वाचा आहे व त्यांना श्री श्री रविशंकर विद्यामंदिर शाळेशी जोडल्या गेल्यानंतर त्यांच्या आयुष्यात कसा अभूतपूर्व बदल झाला हे त्यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले.या कोर्समध्ये पहिल्या दिवसाचे सूत्रसंचालन श्रीमती पूजा मॅडम यांनी केले तर शेवटच्या दिवसाचे सूत्रसंचालन श्रीमती अपूर्वा मॅडम यांनी केले.

पान ६ वरून...

### शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण

त्यांना नव्या शैक्षणिक धोरणांशी समायोजन करून गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठी तयार करणे. यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारे शिक्षण अधिक परिणामकारक आणि समजून घेण्यास सुलभ होणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, शालेय मूल्यांकन प्रक्रियेत बदल, भारतीय ज्ञानप्रणाली, सायबर सुरक्षा, शिक्षकांचे सक्षमीकरण, नेतृत्व विकास, अशा विविध विषयांवर सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणात विचारप्रवण वाचन साहित्य, चर्चा, लेखन, सादरीकरण, व वैयक्तिक डायरी लेखन यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना विशेषतः तयार करण्यात आलेले वाचन साहित्य पुरवले जात असून, त्यात चिंतन, लेखन, चर्चा यासाठी प्रोत्साहन दिले जाते. हे साहित्य विषयांची स्पष्टता, आकलन आणि कृतीक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेले शिक्षक अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत असून, शास्त्रशुद्ध पद्धतीने आयोजित केलेले हे प्रशिक्षण त्यांच्यासाठी ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरत आहे. भविष्यकाळात हे प्रशिक्षण त्यांच्या अध्यापन पद्धतीत व वैयक्तिक व्यावसायिक विकासात मोलाचे ठरणार आहे. उच्च माध्यमिक निवड श्रेणी वर्गासाठी विभाग प्रमुख म्हणून श्री राम सालगुडे व सुलभक म्हणून डॉ. पठाण सिराज खान, श्रीमती देशमुख मॅडम ,श्रीमती मनीषा जाधव व श्रीमती कदिरा बेगम हे उत्कृष्टरित्या कार्य पार पाडत आहेत .

### चिंता करू नका

चांगले त्याचे जीवन चांगले. मित्राने मित्राला समजावून सांगितले पाहिजे. चुकीचा निर्णय घेतला तर वाईट परिणाम होतात. नालायक मित्राशी कधी दोस्ती करू नका, मित्राने मित्राला संकटापासून वाचविले पाहिजे. नालायकात बसण्यापेक्षा माळकऱ्यात बसून जिंदगी चांगली सुधारा असे ते म्हणाले. यावेळी माजी आ.जनार्दन तुपे, श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ, राजाभाऊ गुजर, अंबादास गुजर, सचिन कोठुळे, पंडित माने, सदाशिव सुर्वे, सर्जेराव खटाणे, युवराज बहिरवाळ, मुख्याध्यापक अण्णासाहेब थिटे, प्रदीप जगताप, धनवंत मस्के, राजेंद्र कुऱ्हे, रावसाहेब भोसले, विलास येडे यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला, पुरुष, भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बालाजी रूद्राक्ष मित्र परिवाराने राबविले सामाजिक उपक्रम

## वृक्षारोपण, १०० गरजू महिलांना साड्या, गोशाळेत चारा व बाकडे वाटप ; मतिमंद अनाथ मुलांना भोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर व परिसरात सोमवारी विविध सामाजिक उपक्रम राबवून येथील बालाजी (रूद्र) रूद्राक्ष मित्र परिवाराने आपल्या युवा उद्योजक असलेल्या मित्राचे अभिष्टचिंतन केले.

येथील अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या ७/१२ उद्योग समूहाचे प्रमुख बालाजी रूद्राक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या समस्त मित्र परिवाराकडून सोमवार, दिनांक ९ जुन रोजी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यात १०० गरजू महिलांना साड्या वाटप करणे, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालयात, अंबाजोगाई येथे अल्पोपहार देणे, आशादत्त गोशाळा येथे गायींना चारा, पेंड, नागरिकांना बसण्यासाठी बाकडे (सिमेंट बेंच) वाटप तसेच ४० रोपांचे वृक्षारोपण ही करण्यात आले. सोबतच राष्ट्रसंत गाडगेबाबा मतिमंद अनाथ मुलांचे वसतीगृह, लातूर येथे अन्नदान करून मित्रांनी ७/१२ उद्योग समूहाचे प्रमुख बालाजी रूद्राक्ष यांचा वाढदिवस साजरा केला. सामाजिक बांधिलकी जोपासत वाढदिवस साजरा करणे म्हणजे काय तर, आपल्या आनंदात इतरांना सामावून घेणे होय. या पद्धतीने, आपण ही इतरांना मदत



करून समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. आपण आपल्या वाढदिवसाला एक अर्थपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या सकारात्मक रूप देऊ शकतो. वाढदिवस म्हणजे एखाद्या व्यक्तीचा जन्माचा दिवस, हा दिवस सामान्यतः तो व्यक्ती त्याच्या कुटुंबासोबत, मित्र, मैत्रिणींसोबत किंवा इतर जवळच्या नातेवाईकांसोबत साजरा करीत असतो. एकीकडे वाढदिवस म्हटल्यावर पार्टी, पिकनिक अशा कार्यक्रमांना खतपाणी घातले जात असताना, दुसरीकडे मात्र सामाजिक बांधिलकीचे भान जोपासत आपण समाजाचे काही देणे लागतो या जाणिवेतून बालाजी रूद्राक्ष यांच्या सोबत्यांनी आपल्या एका मित्राचा वाढदिवस आगळ्या-वेगळ्या पध्दतीने साजरा करून विधायक कृतीतून समाजापुढे एक आदर्श ठेवला केला आहे. आशादत्त गो-शाळा परिसरात पर्यावरण संवर्धनासाठी ४० रोपांचे वृक्षारोपण ही केले. यामुळे मित्र परिवाराचे सर्वस्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल ७/१२ उद्योग समूहाचे प्रमुख बालाजी रूद्राक्ष यांनी त्यांच्या मित्र परिवाराचे आभार मानले आहेत. हे विविध उपक्रम राबविण्यासाठी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन करणारे ओंकार घोडके, अजय निकम, वैभव, ओंकार रूद्राक्ष, भंपू रूद्राक्ष, योगेश पोखरकर, स्वरूप घोडके, सोपान, अनिकेत धायगुडे, अमोल धायगुडे, गौरव आकुसकर, धिरज माळी, शुभम पवार, प्रथमेश कणके, राज जोगदंड, प्रेम खैरमोडे, प्रशांत, ओम, अभिराज रेड्डी, अक्षय चव्हाण, आकाश लोदगे, तुषार, सचिन जानकर, कृष्णा नरसिंगे यांच्यासह समस्त मित्रपरिवार उपस्थित होता. यावेळी गोरक्षक उमेशभाऊ पोखरकर यांच्या वतीने आशादत्त गोशाळातील गायींना पेंड, चारा, बाकडे (सिमेंट बेंच) वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी दीपक लामतुरे, कोंडीराम पवार, तिरूपती राठोड, अक्षय धारेकर, आकाश घुले, आदित्य देशमुख, स्वप्नील सोनवणे, कृष्णा नरसिंगे व मित्रपरिवार उपस्थित होता.

# मागील ४२ वर्षांपासून हजारो अभियंत्यांच्या करिअरला दिशा देणारे गिरवलकर पॉलिटेक्निक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलीत, टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ येथे विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विविध नामांकीत एम.एन.सी.कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांना ते शिकत असतानाच नौकरी मिळाली हे विशेष होय.**

एप्रिल-२०२५ महिन्यांत विविध नामांकित कंपन्यांनी भेटी देऊन पॉलिटेक्निक मध्ये कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले होते. यामध्ये सर्वच्या सर्व (१४८) १०० टक्के विद्यार्थ्यांची निवड होऊन, पात्र विद्यार्थ्यांना आकर्षक पगारावर काम करण्याची संधी मिळाली. तसेच द्वितीय वर्षातील ११३ विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी आकर्षक मानधनावर नामांकीत कंपन्यांमध्ये कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळवून देण्यात आली. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक हे मागील ४२ वर्षांपासून तंत्रशिक्षणात विद्यार्थ्यांना घडवत आलेले, ग्रामिण भागातील एक नांवाजलेले एकमेव पॉलिटेक्निक आहे. म्हणून या पॉलिटेक्निक मध्ये पुर्वीपासूनच प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा ओढा आणि पालकांची पसंती आहे. मागील



**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नामांकीत कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना मिळाली नौकरी**

शैक्षणिक वर्षापासून या पॉलिटेक्निक मध्ये, दोन नविन अभ्यासक्रमास तंत्रशिक्षण परीषदेने मंजूरी दिली आहे. त्यामध्ये सिव्हिल इंजिनिअरींग व ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्यूटर इंजिनिअरींग हे होय. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आता एकूण पाच अभ्यासक्रम उपलब्ध झालेले आहेत. कॉम्प्यूटर इंजिनिअरींग, ईलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, मेकॅनिकल इंजिनिअरींग व दोन नविन अभ्यासक्रमामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या अभ्यासक्रमात डिप्लोमा इंजिनिअरींग होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेत या पॉलिटेक्निकचा निकाल सतत उंचावत आलेला आहे. उन्हाळी परीक्षेत विद्यार्थीनींनी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी म.रा.तं.शिक्षण मंडळाच्या गुणवत्ताधारक शिष्यवृत्ती करीता, १३ विद्यार्थी पात्र ठरले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जातो. देश, विदेशात या पॉलिटेक्निकचे विद्यार्थी विविध पदांवर काम करीत आहेत. त्या माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कामाचा अनुभव व मार्गदर्शन सध्या शिक्षण घेत असलेल्या पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना होत आहे. हेच विद्यार्थी देशाचे व महाविद्यालयाचे नांव उज्वल करीत आहेत. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये क्रिडा स्पर्धा, शिवजयंती उत्सव-२०२५, वृक्षारोपण, मुलींसाठी आत्मभान शिबीर, प्रकल्प स्पर्धा, अर्थ साक्षरतेचे महत्व अशा विविध उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जानेवारी-२०२५ महिन्यांत छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या आय.ई.डी.एस.एस.ए.अंतर्गत क्रिडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, क्रिकेट, बुद्धीबळ या स्पर्धांमध्ये भाग घेऊन बॅडमिंटन स्पर्धेत द्वितीय पारीतोषिक मिळविले. फेब्रुवारी-२०२५ महिन्यांत लातूर येथे झालेल्या प्रकल्प स्पर्धेत प्रकल्प सादर करून सहभाग नोंदविला. तसेच शिवजयंतीनिमित्त रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, गड किल्ले बनविणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांच्या आरोग्याची काळजी यावर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.अरूणा केन्द्रे, डॉ.अर्चना थोरात, डॉ.नवनाथ घुगे या तज्ज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मार्च-२०२५ महिन्यांत महिला दिनानिमित्त सावित्रिमाई फुले यांच्या शिक्षण विषयक कार्यावर मुलींनी भाषणातून आपले विचार व्यक्त केले. तसेच मुलींसाठी आयोजित केलेल्या शिवकालीन युद्ध व मर्दानी खेळांचे प्रशिक्षण यामध्ये, लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा यांचे प्रशिक्षण देण्यात आले. सोबतच व्यक्तिमत्व विकास या विषयावर बि.के.कबीर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पॉलिटेक्निकच्या संगणक अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी टेककिर्तीचे आयोजन केले होते. महाविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ बसवंतराव सांगवे, उपाध्यक्ष माधवराव त्रिंबकराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव हणमंतराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल सिद्रामप्पा मिटकरी, सर्व सन्माननीय संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व मार्गदर्शक डॉ.बी.आय.खडकभावी यांनी अभिनंदन केले. पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्हि.बगले व सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचारीवृंद यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत त्यांच्या सर्वांगिण विकासावर सुधारणा घडवून आणत आहेत. विविध नामांकीत कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांना ते शिकत असतानाच नौकरी देणारे टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक हे ग्रामीण भागातील तरूणांसाठी नेहमीच आशेचा किरण बनले आहे.

## कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि.जालना
## प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com — PH no.02483-271787

जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- ११४० — दिनांक: १०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद मारुफ सय्यद मंजुर रा.इस्लामपुरा, बाबा चौक, ता.बीड जि.बीड यांनी नामे १. शेख अबुसुफियान अन्वरपाशा रा. अल्तमश कॉलनी, औरंगाबाद जि. औरंगाबाद २. सय्यद मंजुर जाफर रा.ता.जि.बीड यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १२१ दि. २०/०१/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १७६० दिनांक:- ०९/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. शेख अबुसुफियान अन्वरपाशा रा. अल्तमश कॉलनी, औरंगाबाद जि. औरंगाबाद २. सय्यद मंजुर जाफर रा.ता.जि.बीड नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १२,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२७,२८,२९ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १७०५/१२ व १७०५/१६ ते १७०५/२३ आणि १७०५/२७ ते १७०५/२९ असे १२ मिळकती मधील एकुण क्षेत्र ९८२.९५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

**प्लॉट नं. १२ मधील क्षेत्र ७९.३० चौ.मी चतु:सिमा**
पुर्व :- ९ मीटरचा कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम :- गट नं. २३९ मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. ११
उत्तरेस : प्लॉट नं. १३

**प्लॉट नं. २० मधील क्षेत्र ८३.२०० चौ.मी चतु:सिमा**
पूर्व:- ९ मीटरचा कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम :- गट नं. २३९ मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १९
उत्तरेस १२ मीटरचा कॉलनी अंतर्गत रोड

**प्लॉट नं. १६ ते १९ मधील क्षेत्र ३१७.२० चौ.मी संयुक्त चतु: सिमा**
पुर्व :- ९ मीटरचा कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९ मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १५
उत्तरेस प्लॉट नं. २०

**प्लॉट नं. २१ ते २३ मधील क्षेत्र २५१.६२५ चौ.मी संयुक्त चतु: सिमा**
पूर्व: प्लॉट नं. ४०,४१,५२
पश्चिम :- ९ मीटरचा कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण : प्लॉट नं. २४
उत्तरेस :- खुली जागा

**प्लॉट नं. २७ ते २९ मधील क्षेत्र २५१.६२५ चौ.मी संयुक्त चतु: सिमा**
पूर्व प्लॉट नं. ३४,३५,३६ — पश्चिम :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण : प्लॉट नं. ३० — उत्तरेस प्लॉट नं. २६

या वरील चतु:सिमा मधील ९८२.९५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत घनसावंगी**

cmyk

# महाराष्ट्रातील वातावरणात बदल!

## पावसाचा जोर वाढणार, पुढील आठवडाभर कसं असेल हवामान?

राज्यातील वातावरणात बदल होत आहे. काही भागात तुरळक पाऊस पडत आहे, तर काही ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्याचे दिसत आहे. दरम्यान, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. भागत बदलत राज्यात पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले. राज्यात नेमका कुठं कुटं पाऊस पडणार याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात. राज्यात १० ते ११ जूनच्या दरम्यान दक्षिण महाराष्ट्राकडे पाऊस पडणार आहे. पण सर्व राज्यात सांगायचं झालं तर ११ जूनपासून म्हणजे १२ ते १३ जूनच्या नंतर पाऊस वाढत जाणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे. पूर्व विदर्भ, पश्चिम विदर्भाकडे ११ च्या नंतर १२ ते १३ जूनला पाऊस येणार आहे. दक्षिण महाराष्ट्राकडे १०, ११, १२ जून पासूनच पाऊस चांगल्या प्रमाणात पडणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले.



११ जूनपासून २० जून पर्यंत मराठवाड्यात चांगला पाऊस पडणार

मराठवाड्यामध्ये आज तुरळक ठिकाणी पाऊस पडणार आहे. त्याच्यानंतर ११ जूनला मराठवाड्याकडे चांगला पाऊस वाढत जाणार आहे. मराठवाड्याकडे ११ जून पासून ते २० जून दरम्यान चांगला पाऊस पडणार आहे. दररोज भाग बदलत मराठवाड्यात पाऊस पडणार असल्याची माहिती पंजाबराव डख म्हणाले.

राज्यात १२ जून नंतर पावसाची व्याप्ती वाढणार

उत्तर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला सांगू इच्छितो की, १२ जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात पाऊस पडणार आहे. पश्चिम महाराष्ट्रा १० जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात भाग बदलत दररोजच पाऊस पडणार आहे. राज्यात १२ जून नंतर पावसाची व्याप्ती वाढत जाणार आहे. १३ ते २० जून दरम्यान राज्यात सगळीकडे भाग बदलत बदलत पाऊस पडणार आहे.

भाग बदल पडणार पाऊस

राज्यात १३ जून ते १८ जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात जोराचा पाऊस पडणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, संगमनेर, नगर या जिल्ह्यात अति मुसळधार पाऊस पडणार आहे. १३ जून ते १८ जून च्या दरम्यान लातूर, नांदेड, बीड, धाराशीव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, जालना, त्याच्यानंतर उत्तर महाराष्ट्रामध्ये धुळे, नंदुरबार, जळगाव, पारगुळा तसेच बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, हिंगोली, वाशिम, यवतमाळ सांगायचं झालं तर सर्व जिल्ह्यात खूप पाऊस पडणार आहे.

# ढगाळ वातावरणात फळबागा आणि भाजीपाल्याचे व्यवस्थापन

मागील आठवड्यापासून राज्यातल्या अनेक भागात पावसाने हजेरी लावली. तर अद्यापदेखील अनेक भागात वातावरण ढगाळ होते आहे. याचा परिणाम शेती पिके आणि फळबागांवर झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार लवकरच पाऊस सुरू होणार आहे. अशावेळी फळबागांचे व्यवस्थापन महत्वाचे ठरते.

१) संत्रा मोसंबी : संत्रा/मोसंबी बागेत अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. मागील आठवडयातील ढगाळ वातावरणामूळे संत्रा/मोसंबी बागेत रस शोषण करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १० मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८% ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मागील आठवडयातील ढगाळ वातावरणामूळे लिंबुवर्गीय पिकांत कोळी किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्क ५% किंवा अ‍ॅझाडिरेक्टीन (१० हजार पीपीएम) ३ ते ५ मिली प्रति लिटर याप्रमाणे फवारणी करावी. रासायनिक नियंत्रणासाठी डायकोफॉल १८.५ ईसी २.७ मिली किंवा डायफेनथीयूरोन (५० डब्ल्यूपी) २ ग्रॅम किंवा विद्राव्य गंधक ३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता असल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

२) डाळिंब :डाळींब बागेत अंबे बहाराच्या नियोजनासाठी जमिनीच्या प्रकारानूसार तिन ते सहा आठवडे बागेस पाणी देणे बंद करावे (बागेस ताण द्यावा). काढणीस तयार असलेल्या चिकू फळांची काढणी करावी.

भाजीपाला :भाजीपाला पिकात अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. भाजीपाला पिकास आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. मागील काही दिवसात ढगाळ वातावरणामूळे भाजीपाला (मिरची, वांगे व भेंडी) पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन ५% + फेनप्रोपाथ्रीन १५% १० मीली किंवा डायमेथोएट ३०% १३ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी करून घ्यावी.



# कोंबडी खताचा वापर शेतीसाठी अत्यंत फायद्याच



शेती ही आपल्या देशातील प्रमुख आणि परंपरागत व्यवसाय आहे. शेती करताना पेरणीपासून ते पीक काढणीपर्यंत शेतकऱ्याला प्रत्येक टप्प्यावर खूप मेहनत घ्यावी लागते. आधुनिक काळात उत्पादन वाढवण्यासाठी अनेक जण रासायनिक खतांचा वापर करतात. मात्र, याचा दीर्घकालीन परिणाम जमिनीच्या सुपीकतेवर, आरोग्यावर आणि पर्यावरणावरही होतो. त्यामुळे आता शेतकरी पारंपरिक आणि सेंद्रिय शेतीकडे वळू लागले आहेत. यामध्येच एक उत्तम पर्याय म्हणजे कोंबडी खताचा वापर. शेतकरी यशस्वी करत असून त्यांना चांगले उत्पादन मिळत आहे. कोंबडी खत हे पोल्ट्री फार्ममधून मिळणारे एक सेंद्रिय खत आहे, ज्यामध्ये अंडी देणाऱ्या कोंबड्यांचे विष्ठा आणि अंथरुणातील जैविक पदार्थांचे मिश्रण असते. हे खत द्रव आणि घन स्वरूपात मिळते. त्यामध्ये भरपूर प्रमाणात नत्र, स्फुरद, पालाश यासारखे पिकांना अत्यंत आवश्यक असणारे अन्नद्रव्ये असतात. याशिवाय त्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, झिंक, बोरॉन, फेरस, कॉपर इत्यादी सूक्ष्म अन्नद्रव्येही असतात. ही सर्व घटक पिकांच्या वाढीसाठी आणि उत्पादनासाठी फायदेशीर असतात.

कोंबडी खताचे फायदे :कोंबडी खताचा वापर केल्यास अनेक फायदे होतात. सर्वात पहिला फायदा म्हणजे जमिनीची सुपीकता वाढते. सेंद्रिय घटकामुळे मातीचा पोत सुधारतो, त्यातील सजीव क्रियाशीलता वाढते आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता अधिक होते. त्यामुळे जमिनीत पिकांचे मूळ अधिक बळकट होते. दुसरा फायदा म्हणजे पीक लवकर आणि जोमाने वाढते. कोंबडी खतातील अन्नद्रव्ये सहजपणे मुळांपर्यंत पोहोचतात आणि त्याचा त्वरीत परिणाम दिसून येतो. यामुळे उत्पादनात वाढ होते आणि पिकांचा दर्जाही सुधारतो. तिसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. कोंबडी खतामुळे पिकांची प्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करता येतो, आणि शेती विषमुक्त राहते. त्यामुळे आरोग्यासाठीही हे सुरक्षित ठरते.

कोंबडी खताची किंमत आणि उपलब्धता :कोंबडी खत हे बाजारात इतर रासायनिक खतांच्या तुलनेत खूपच स्वस्त आहे. सध्या एका टन कोंबडी खताची किंमत अंदाजे १२०० रुपये आहे. त्यामुळे कमी खर्चात अधिक फायदे मिळवू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे एक चांगले पर्याय ठरते. शिवाय याचे कोणतेही दुष्परिणाम नसतात. हे खत वापरताना बीजप्रसार, तणांची वाढ किंवा जमिनीवर दुष्परिणाम होत नाही.

कोंबडी खत वापरण्याच्या पद्धती : शेतात कोंबडी खत वापरताना ते जमिनीत मिसळून दिले जाते. विशेषतः पेरणीपूर्वी अथवा पिकांच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यावर हे खत वापरल्यास अधिक फायदे होतात. काही शेतकरी पंचगव्य किंवा इतर सेंद्रिय फवारणीसह याचा वापर करून शाश्वत शेतीकडे वाटचाल करत आहेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्रेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : अ‍ॅनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# अंजीराची शेती करण्यासाठीचे तंत्रज्ञान

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता. तुम्ही आजारी असाल किंवा काही आरोग्य समस्या असल्यास ते तुम्हाला बरे वाटण्यास मदत करू शकतात. लोक औषध बनवण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अंजीर उगवणारे महाराष्ट्र हे भारतातील अव्वल राज्य आहे. अंजीर महाराष्ट्रात व्यवसाय म्हणून घेतले जाते आणि ते तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये देखील घेतले जाते.

अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.



फील्ड तयारी :अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

पेरणी आणि बियाणे प्रमाण :अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

वनस्पती सिंचन :जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.

वनस्पती काळजी :जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.

# कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे-भाई जयंत पाटील

## मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार

केज । प्रतिनिधी

मराठवाडा हा सातत्याने सतत दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला समन्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले.



मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा.एस.व्ही.जाधव होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ॲड.मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ॲड. गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले. तर आभार प्रा.उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे,ॲड. निखिल बचुटे,मुंजा पांचाळ, मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

केजध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या विभागीय मेळाव्याच नियोजन कमी वेळात मोहन गुंड यांच्या टिमणे केल याच कौतुक पक्षाच्या वरिष्ठांनी केले, सर्वांशी संपर्क असणाऱ्या मोहन गुंड यांना पक्षाने जबाबदारी द्यावी आस कार्यकर्ते बोलून दाखवत होते, त्यामुळे लवकरच मोहन गुंडवर जिम्मेदारी पडेल कालच्या मेळाव्यातुन दिसून आले आहे व तशा उपस्थित आतून चर्चा ऐकण्यास मिळाले आहेत.

# दशनाम गोसावी समाजाच्या गुणोत्तरी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

## समाजाच्या प्रश्नासाठी तत्पर राहू :राजू जाधव



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे दशनाम गोसावी परिषद पाटोदा आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ सोहळा पाटोदा येथे आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष राजू भैया जाधव, पद्मभूषण वसंत दादा महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब हांगे सर, दशनाम गोसावी संघटनेचे जिल्ह्याचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र बन साहेब, प्राचार्य कदम सर, दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष बन साहेब यांची विशेष उपस्थिती होती.

दशनाम गोसावी समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि पाठबळ मिळण्यासाठी प्रयत्न करावेत आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणावे असेही यावेळी आव्हान करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नगराध्यक्ष राजू भैया यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना वेळोवेळी सहकार्य करत राहू तसेच नगरपंचायत च्या माध्यमातून लोकनेते सुरेश अण्णा धस यांच्या माध्यमातून समाजाच्या व विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू तसेच ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे त्या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणासाठी आमदार धस अण्णांकडून सहकार्य करू तसेच पाटोदा नगरपंचायत च्या माध्यमातून दशनाम गोसावी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न, घरकुल योजनेचे प्रश्न देखील सोडवण्यात येतील असे यावेळी त्यांनी सांगितले या कार्यक्रमाचे आयोजन श्री मारुती गिरी, बबन गिरी यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी पाटोदा नगरीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी विभाग व आत्माच्या वतीने बनकरंजा येथे पेरणी पूर्व मार्गदर्शन

## कृषी सहाय्यक गोरे यांनी केले शेतकऱ्यांना मार्गदर्शन



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनकरंजा येथे आज कृषी विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पेरणी पूर्व बिजप्रक्रिया कसी करायची हे प्रत्यकक्षात गावोगावी जावून कृषी सहायक यांनी शेतकऱ्यांना करून दाखवले यावेळी सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक, सोयाबीन उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक,तसेच कृषी महाविस्तार अँप बाबत सविस्तर मार्गदर्शन कृषी सहायक श्रीमती गोरे मॅडम यांच्याकडून करण्यात आले.

यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती. गोरे मॅडम,आत्मा विभागाचे श्री.आनंद मुंडे साहेब उपस्थित होते.बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना पेरणी पूर्व बीज प्रक्रिया कसी करायची याची माहिती कृषी विभागातर्फे मोठ्या प्रमाणावर देण्याचे काम चालू आहे याच धरतीवर आज केज तालुक्यातील बनकरंजा येथे केज तालुका अधिकारी श्री पठाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी विभागाची टीम मोठ्या प्रमाणात काम करतांना दिसत आहे कृषी सह्याक श्री गोरे मॅडम व आत्मा विभागाचे श्री अनंत मुंडे साहेब व सोबत कृषी ऑफिस ची टीम यांनी गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना एकत्र बोलावून बीज प्रक्रिया कसी करायची व बीज उगवन क्षमता कसी ओळखायची अस्या प्रकारे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना करून दाखले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणी काळात बीज प्रक्रिया करतांना अडचण येणार नाही याची काळजी जिल्हा कृषी विभाग व तालुका कृषी विभाग मोठ्या प्रमाणावर घेत असल्याच आपल्याला पहायला मिळत आहे यावेळी गावातील शेतकरी मधुकर मारुती लांब, बाबुराव पांडुरंग मुंडे, प्रताप थोरात, बीबीशन नागरगोजे, बंडू पवार, विकास थोरात, अशोक थोरात, दिलीप थोरात, अंगद थोरात, नारायण मुंडे, भागवत थोरात, माऊली लांब, अनिल थोरात यांच्या सह मोठया प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

# गढूळ पाणी आणि आंब्यांमुळे पोटदुखीचे रुग्ण वाढले!

## नागरिकांनो, सावधानता आणि दक्षता बाळगा – एस.एम.युसूफ़

बीड । प्रतिनिधी

मे महिन्यात झालेल्या सर्वदूर पावसामुळे तलावातील पाण्याची पातळी वाढली तसेच पाणी गढूळ झाले. बीड नगर परिषदेकडून नळांना गढूळ पाण्याचा पुरवठा करण्यात येऊ लागला आहे. तसेच पाऊस पडल्यानंतर वेगवेगळ्या जातीचे कलमी आंबे खाल्ल्यामुळे ही अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. म्हणून जिल्हा रुग्णालयासह अनेक सरकारी रुग्णालय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये पोटदुखीचे रुग्ण वाढले आहे. ही बाब लक्षात घेता नागरिकांनी सावधानता आणि दक्षता बाळगावी. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहराला बीड नगर परिषदेकडून करण्यात येणारा पाण्याचा पुरवठा आठ ते पंधरा दिवसात करण्यात येत आहे, तोही गढूळ आहे. नळांना येणारे पाणी अक्षरशः माती कालविल्यासारखे येत आहे. उच्चभ्रू लोक पिण्यासाठी घरच्या बोअरचे आर ओ लावलेले फिल्टर पाणी वापरतात तर मध्यमवर्गीय लोक थंड जार चे पाणी वापरतात. मात्र सर्वसामान्य गोरगरिबांना बीड नगर परिषदेकडून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरच अवलंबून राहावे लागते. आणि तेही अशाप्रकारे गढूळ येत आहे. तेच पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. या त्रासापासून वाचण्यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्यात त्रुटी फिरवावी. गाळ खाली गेल्यावर ते पाणी पिण्यासाठी वापरावे किंवा पिण्याचे पाणी गरम करून थंड करावे आणि नंतरच पिण्यासाठी वापरावे तसेच यावेळी पाऊस मे महिन्यातच पडला. पाऊस पडल्यानंतर आंब्यांची चव बदलते तसेच ते खाल्ल्याने कुणाला पचते कुणाला पचत नाहीत. ज्यांना पचते त्यांना तर काही होत नाही परंतु ज्यांना पचत नाही त्यांना मळमळ, पोटदुखी, डोकेदुखी सारखे आजार उद्भवतात. असा त्रास होत असल्यास असे का होत आहे, याचे निरीक्षण करून आंब्यांमुळे होत असेल तर आंबे खाणे टाळावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# चौसाळा ते सात्रा-पोत्रा बस सेवा चालू करण्याची मागणी


बीड । प्रतिनिधी

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असुन शाळाही काही दिवसांत च चालू होणार आहेत. त्या मुळे प्रवासी वाहतूक व विद्यार्थ्यांना शाळेत येण्याजाण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागेल याच कारणात्सव ग्रामपंचायत कार्यालय सात्रा -चांदणी व परिसरातील जनतेच्या वतीने चौसाळा ते सात्रा – पोत्रा हि कोरोणा काळापासून बंद असलेली बस सुरू करण्याची मागणी बीडच्या बस स्थानक आगारप्रमुखांकडे करण्यात आली आहे. या विषयी सविस्तर माहिती अशी की, मागील काही दिवसा पासून म्हणजे च कोरोणा काळापासून चौसाळा ते सात्रा पोत्रा बस सेवा बंद करण्यात आली आहे. बीड ते नांदूर सात्रा – पोत्रा मार्गे बसगाडी च्या नियमितपणे फे-या होत्या, त्या कोरोना काळापासुन होत नाहीत. आता १६ जून पासून शाळा सुरु होत आहेत. शाळेतील मुलांची व वयोवृद्ध अबाल प्रवासाची गैरसोय होत असल्या कारणामुळे चौसाळा ते सात्रा- पोत्रा बस सेवा ही सुरू करावी सात्रा- पोत्रा बस सकाळी चौसाळा येथे ०८:३० वाजता असावी व दुपारी शाळा सुटण्याच्या वेळेमध्ये ०५ वाजता बस चौसाळा स्थानकावर येथे असावी म्हणजेच जेणेकरून विद्यार्थी व जनतेचे गैरसोय होणार नाही. याची नोंद आगारप्रमुखांनी घेऊन तात्काळ सर्व सामान्य जनतेचा व विद्यार्थ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या मागणीकडे गांभीर्याने विचापुर्वक लक्ष देऊन त्वरीत मागणी पुर्ण करावी असे ग्रामपंचायत च्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे ग्रामपंचायत कार्यालय सात्रा चांदणी चे सरपंच पद्माकर काळे व ग्रामसेवक वाघमारे साहेब यांच्या स्वाक्षरी सह परिसरातील जनतेच्या वतीने बीड बसस्थानकाचे आगार प्रमुखांकडे केली आहे.

# सोहम सानप करणार इस्त्रोची वारी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोद्यातील आठवीत शिकणारा सोहम सानप करणार इसरोची सेर लिटर फ्लावर इंग्रजी शाळेत ८वीं शिकणारा सोहम सानप हा भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोची सर करणार जनसेवा सामाजिक शैक्षणिक प्रतिष्ठान अहमदनगर यांच्या वतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत गौरवित यश संपादन केल्याने त्यास इस्रोच्या भेटीची संधी मिळाली आहे ही परीक्षा उत्तीर्ण होणार सोम हा पाटोदा तालुक्यातील पहिला विद्यार्थी ठरला जनसेवा सामाजिक शैक्षणिक प्रतिष्ठान अहमदनगर ही संस्था दरवर्षी सी वी रमण बालवैज्ञानिक परीक्षेचे आयोजन करत असते परीक्षेतून गुणोत्तर आधारित बालवैज्ञानाचे निवड केली जातेण



शैक्षणिक कार्याबरोबर वैज्ञानिक संशोधन आवड असलेल्या स्वामी यांनी परीक्षेत यश मिळून इसरोची शेअर करण्याचे स्वप्न पाहिले त्यासाठी त्यांनी शाळेतील शिक्षक वडील अर्जुन सानप यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेत प्रविष्ट झाला जिद्द व चिकटली अभ्यास करत त्याने १५० गुणांच्या परीक्षेत विज्ञान अंकगणित बुद्धिमत्ता सामान्य ज्ञान या सर्व प्रकारच्या प्रश्नांमधील बहुतांश प्रश्नांची अचूक उत्तरे देत ९४ गुण मिळवले त्यास प्राचार्य नजीर पठाण शिक्षिका सीमा यांनी त्यास मार्गदर्शन केले एवढ्या लहान वयात इस्रोची पाहणी हा सोहमच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरणार आहे. आई वडील शिक्षक असल्याने त्यांच्या आईने वडिलांनी मेहनत करून त्यांच्याकडून अभ्यास करून घेत हे संपादन त्याला मिळून दिले. विशेष त्याच्या आईने त्याच्याकडून कटर मिळण्याची नाही अभ्यास करून घेत त्याला हे यश मिळवून दिले.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार किशोर रंगनाथराव शिराळे, रा. शिवाजी नगर, बीड ता. जि.बीड यांनी मला दिलेल्या अधिकार व दिलेल्या माहितीवरुन सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, धनंजय जनार्धन खोड रा. वासनवाडी ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील मौजे वासनवाडी ग्रा. पं. हद्दीतील सर्व्हे नं. १५१ मधील प्लॉट क्र. ८ ज्यास ग्रा.पं. वासनवाडी मिळकत क्र. ४३९५ असा मिळालेला आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ ४४२.०० चौ.मी. म्हणजेच ४७५५.९२ चौ. फुट आहे. सदर प्लॉटचा मोजणी क्रमांक ९०३/२०२३ दि. १२.०४.२०२३ व मा. उपविभागीय अधिकारी, बीड यांनी दिलेला जा.क्र.२०२५/जमा/तुकडेबंदी/तु. नियमीत करणे/मौ. वासनवाडी/ग.नं./स.नं. १५१/प्र.क्र.-०६ दि.२३.०५.२०२५ या शेतजमीनीचा भुखंड नियमीत करण्याची परवानगी मिळालेली असुन ज्याची चतुःसिमा पुर्वेस याच लेआऊट मधील प्लॉट क्र. ७, पश्चिमेस याच लेआऊट मधील प्लॉट क्र. ९, दिक्षणेस धुरपताबाई शंकर खोड यांनी विक्री केलेली जमीन, उत्तरेस २४ मिटर खापर पांगरी रोड अशी आहे.

उपरोक्त वर्णनातील प्लॉट मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट हा पुर्णपणे निर्विवाद, निरर्जोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट संपादित झालेला नाही अथवा तशी नोटीस प्लॉट धारकास आलेली नाही. व सदर प्लॉट हे कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही. तसेच प्लॉट मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरां सोबत सदर प्लॉटच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर प्लॉट त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील प्लॉट खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून ०८ दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत
स्वाक्षरित
**ॲड. शैलेंद्र कांबळे**
**मो. ९८८१५६४७४८**

जाहीर प्रगटन देणार
स्वाक्षरित
**किशोर रंगनाथराव शिराळे,**
रा. शिवाजी नगर, बीड ता.जि. बीड
मो.नं.९०११३६५६५७

# खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् चिंचोलीमाळी सबस्टेशनला मिळाले रोहित्र

## सबस्टेशनला मिळाले ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचांगली माळी येथील सबस्टेशन येथे ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून आल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरण विभागाचे मुख्यअंभियता लातूर यांना पत्र लिहले होते. यानंतर दि.९ रोजी याठिकाणी रोहित्र मिळाले असून याबाबत ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

चिंचोली माळी येथे महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र, कमी क्षमतेच रोहित्र याठिकाणी असल्याने अनेकदा अडचणीचे ठरत होते. सदरील ठिकाणी ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मिळवून देण्यात यावे, अशी ग्रामस्थ आणि परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. दरम्यान, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरणचे मुख्य अभियंता यांना पत्र देऊन सदरील काम मार्गी लावावे, असे म्हटले होते. यानंतर ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर रोहित्रचे काम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या देण्यात यावा, अशा सुचनाही देण्यात आल्या होत्या. सदरील कामाची प्रशासकिय मान्यता आल्यानंतर परवानग्यांचा विषय समोर आला होता. यातही खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यानंतर दि.९ जून रोजी रोहित्र बसविण्यात आले. आता रोहित्र बसविल्याने उच्च दाबाने विद्यूत पुरवठा होणार आहे. शिवाय शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, खा.सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात बारकाईने लक्ष घालून पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी खासदार सोनवणे यांचे आभार मानले.

# राजेगावचा रस्ता बनला मृत्यूचा सापळा; दवाखान्यात जाणाऱ्या रुग्नांचा जिव धोक्यात!

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असुन ठिकठिकाणी रस्त्यावर दोन दोन फुट खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरुन वाहणे चालवणे तर सोडाच परंतु धड पायी देखील चालता येत नाही. तालुक्यातील रस्ते बेवारस स्थितीत पडले आहेत. या रस्त्यावरून शेतकरी बांधव पाईप लाईन करुन रस्ते खोदून टाकले आहेत. त्यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. मात्र सा.बां.विभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी याकडे डुंकूनही पाहत नसल्याने या बेवारस रस्त्याला वालीच नसल्याचे दिसुन येत आहे.त्याच प्रमाणे राजेगावकडे जाणारा रस्ता अक्षरशः खडड्याने व्यापुन गेला असुन या रस्त्यावरून रुग्नांना दवाखान्यात नेहणे अवघड होऊन बसले आहे. यावरून मेटे साहेबांची नक्कीच उणीव भासत असुन जिल्हाभर फिरणाऱ्या ज्योतीताईंनी एकदा आपल्या राजेंच्या राजेगावकडे यावेच



अशी आर्त हाक या भागातील जनता देत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कैक रस्ते खोदून टाकल्यागत झाले असल्याचे पहावयास मिळत असुन या सत्याकडे पाहण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचारी यांना वेळ नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने उन्हाळ्यात तर या रस्त्याचे कामे केलेच नाहीत. परंतु दोन दोन फुट खोल पडलेल्या खड्ड्यात किमान माती तरी टाकुन खड्डे बुजवणे गरजेचे आहे.मात्र असे होताना काही दिसत नाही. कारण या दुरावस्था झालेल्या रस्त्याच्या बातम्या अनेक पत्रकार बांधवांनी वर्तमान पत्रातील प्रसिद्ध केल्या होत्या तरी गेंड्याची कातडी पांघरलेल्या आणि झोपेचे सोंग घेतलेल्या निगरगट्ट अधिकाऱ्याला याच काही देणंघेणं राहीलेले नाही. कारण केज ते नांदूरघाट राष्ट्रीय मार्ग ६४ वरुन ई.जि.मा.१३० सांगवी सारणी ते राजेगाव आणि मांजरा नदी सीमेपर्यंत रस्ता जातो. त्यापैकी केज बीड अर्थात सांगवी सारणी ते राष्ट्रीय मार्ग ६४ पर्यंत या रस्त्याचे काम काही दिवसांपुर्वीच केले आहे. परंतु रा.मा. ६४ येथुन ई.जि.मा.१३० म्हणजेच राजेगाव पाण्याची टाकी ते राजेगाव मांजरानदी जिल्हा हद्दी पर्यंतचा रस्ता हा पाणी देखील चालण्या लायक राहिला नाही.

याच रस्त्यावर राजेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र असुन या रस्त्यावरून रोज रुग्णांची येजा असते अतिशय कठीण परिस्थितीतून मार्ग काढत या रस्त्यावरून जावे लागत असुन दुचाकीवरून जाणे तर जिकिरीचे झाले आहे. त्यात जर एखादी गरोदर महिलेला प्रसुतीसाठी या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेहायाचे असेल तर काय होईल याची कल्पना न केलेली बरी. या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे सा.बां.विभागाच्या अधिकारी यांना अनेक वेळा सांगण्यात आले. मात्र या अधिकाऱ्यांना या रस्त्याकडे पाहण्यासाठी वेळ नाही. त्यांना जनतेने पायघड्या घातल्या आहेत.तरी या रस्त्याचे काम करत नाहीत. आज जर का स्व.विनायकराव मेटे साहेब असते तर या रस्त्याची दयनीय अवस्था झाली नसती. या भागात मेटे साहेबांनी अनेक जनतेच्या हिताची कामे केले होते. मात्र या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे स्व.विनायकराव मेटे साहेबांची उणीव भासत आहे. मात्र सर्व जिल्ह्यात जनतेच्या विविध प्रश्नांवर स्व.विनायकराव मेटे यांच्या पत्नी डॉ.ज्योतीताई मेटे या काम करत असल्या तरी स्वता:च्या गावचा रस्ता उखडून गेला असुन त्यावर चालणे अवघड झाले आहे. त्यांनी त्यांच्या राजेगाव गावच्या या रस्त्यावर एकदा येवुन हे रास्ता बघायलाच पाहिजे. अशा प्रतिक्रिया या परिसरातील जनतेतून बोलले जात आहे.

राज्य लोकतंत्र

बुधवार, दि.११ जुन २०२५ | ६

# माजी मंत्री बच्चु कडु यांच्या बेमुदत अन्नत्याग अंदोलनास सत्ताधारी पक्षाचे आ.प्रकाश सोळंकेंचा जाहिर पाठिंबा

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रहार पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चु कडु यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसह १४ मागण्यासाठी गेल्या तिन दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनास बसले असुन बच्चु कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनास सत्ताधारी पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दि १० जुन मंगळवार रोजी पत्राद्वारे जाहीर पाठिंबा दिला आहे.

यासंदर्भात प्रहार चे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चु कडु यांना उद्देशून दिलेल्या पत्रात सत्ताधारी पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी बच्चु कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनास पाठिंबा दिला असुन ज्या मागण्यासाठी बच्चु कडु यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले असुन बेमुदत अन्नत्याग अंदोलनास माझा जाहिर पाठींबा असल्याच नमुद केले आहे.पाठींब्याच्या पत्रात नमुद मागण्या पुढील प्रमाणे आहेत त्यामध्ये,दिव्यांग







व विधवा महिलांना रूपये ६०००/- मानधन देणे,आपल्या संकल्पानुसार शेतकऱ्यांना संपुर्ण कर्ज माफी देण्यात यावी,शेतमालाला एमएसपी (हमीभाव) वर २०% अनुदान देणेबाबत,दि.०७ एप्रिल २०२५ रोजी आपल्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तप्रमाणे शासन निर्णय काढणे बाबत,युवकांच्या हाताला काम द्यावे नाहीतर सन्मानजनक दाम देण्यात यावे तसेच रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात व जास्त पदसंख्यांच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात यावी,शहराप्रमाणे ग्रामीण भागातील घरकुलांकरिता समान निकष लावुन किमान रू ५ लक्ष अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देणेबाबत,शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुरांच्या अपघाती मृत्यू झाल्यास आर्थिक सहाय्य देणे व शेतमजूरांकरी स्वतंत्र मंडळ स्थापन करणेबाबत,पेरणी ते कापणी पर्यंत मजूरीची सर्व कामे एमएसपी मध्ये घेणे व फळपिकांना ३:५ रेषो लावुन दुग्ध व्यवसाय सुध्दा एमएसपी ला जोडण्यात यावे. हे जर होत नसेल तर तेलगंगणाच्या धर्तीवर एकरी १०,०००/- रू. मदत किंवा भावाचा चढउतार निधी देणेबाबत,ज्याप्रमाणे रासायनिक खाताला अनुदान देण्यात येते त्याच प्रमाणे खेणखताला/सेंद्रीयखताला अनुदान देणेबाबत,मेंढपाळ व मच्छीमार यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्यांचे प्रश्न मार्गी लावणे,कांद्याचे दर स्थिर राहावेत यासाठी किमान ४०/- रूपये बाजार भाव होई पर्यंत बंदीचा निर्णय करू नये,सन २०२५-२६ या वर्षासाठी ऊस पिकाला प्रति टन ४३००/- रू. दर १% रिकव्हरी बेस रेट मिळावा तसेच पुढील ११% रिकव्हरीसाठी ४३०/- रू. एफआरपी दर मिळावेत. तसेच प्रत्येक शेतकऱ्याला काटा करून रिकव्हरी काव्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे व १५ दिवसामध्ये पैसे दिले नाही तर व्याजासह पैसे वसूल करण्याचे अधिकार स्थानिक यंत्रणेला देणेबाबत.या मागण्यासाठी प्रहार चे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चु कडु यांनी सुरु केलेल्या अन्नत्याग आंदोलनास सत्ताधारी पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दि १० जुन मंगळवार रोजी पत्राद्वारे पाठींबा जाहीर केला आहे.

# राष्ट्रवादी जिल्हा कार्यालयात खुर्शीद आलम यांच्या हस्ते ध्वजारोहण



**बीड । प्रतिनिधी**

आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचे २६ वर्धापनदिन निमित्ताने बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला आहे, यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विधानसभा अध्यक्ष मदन जाधव सर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, तर तालुका अध्यक्ष बाबासाहेब गोरे यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले, कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी ग्रंथालय सेलचे डॉ.राजेंद्र

**ता.अध्यक्ष गोरे,विधानसभा अध्यक्ष मदन डॉ.सानप, युवकाध्यक्ष दुधाळ उपस्थित होते**

सानप, राष्ट्रवादी युवक चे शहराध्यक्ष सचिन दुधाळ, जेष्ठ नेते अनिल कर्डुले, शेख सबुर, सुशील जाधव, फैय्याज मन्यार, नितीन खांडे,शेख कलीम,शेषराव तांबे, अभय बीडकर, कुणाल चौहान, सोफ्यान कुरेशी,अमित चव्हाण, महेबुब इनामदार, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# दंडम अण्णा यांच्या जयंतीनिमित्त पसायदानमध्ये वृक्ष लागवड

**बीड । प्रतिनिधी**

येथील स्वर्गीय दंडम अण्णा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने ही जयंती ढेकनमोह येथील पसायदान प्रकल्पामध्ये वृक्ष लागवड आणि अन्नदान करून साजरी करण्यात आली. यावेळी दंडम अण्णा यांच्या मुलांनी पसायदान सेवा प्रकल्प परिसरामध्ये ५१ वृक्षांची लागवड केली.

बीड येथील सामाजिक कार्यकर्ते दंडम अण्णा यांनी कुटुंबांना आधार दिलेला आहे. अडचणीत असलेल्या लोकांना धीर दिलेला आहे. दंडम अण्णा हे स्वतः पसायदान सेवा प्रकल्प मध्ये वाढदिवसानिमित्त येऊन सामाजिक कार्यक्रम साजरा करत होते. त्यांच्या पक्षात त्यांच्या कुटुंबीयांनी ही परंपरा कायम ठेवत पसायदान सेवा प्रकल्प मध्ये सामाजिक



कार्यक्रम आणि पर्यावरण पूरक कार्यक्रम साजरा केला. यावेळी दंडम अण्णा यांच्या मुलांनी पसायदान सेवा प्रकल्पामध्ये ५१ वृक्षांची लागवड केली. तसेच पसायदान मधील मुलांना अन्नदान दिले. यावेळी पसाधन सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी दंडम अण्णा यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य समर्थकांची उपस्थिती होती.

# शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी बीडमध्ये 'वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी' प्रशिक्षण यशस्वी

**डॉ.विक्रम सारुक यांच्या उत्तम नियोजनामुळे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणात मग्न**

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बीड जिल्ह्यात वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण होत आहे. २ जून २०२५ ते १२ जून २०२५ या कालावधीत बीड शहरातील विविध केंद्रांवर हे प्रशिक्षण अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात राबवले जात आहे. ज्यात १२ वर्षे व २४ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचा समावेश आहे.**

या प्रशिक्षणाचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (), बीड यांच्या वतीने करण्यात आले असून,



या संस्थेचे प्राचार्य डॉ. विक्रम सारुक यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडत आहे. बीड येथील द. बा. घुमरे माध्यमिक विद्यालय, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे बीड हायस्कूल व अन्य निवडक केंद्रांवर हे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षकांना शैक्षणिक बदलांची जाणीव करून देणे,

◀◀ पान ३ वर

# शेतातील विजेच्या तारेने घेतले ३ बळी

**वडिलांना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या २ मुलांचाही मृत्यू**

**जालना । प्रतिनिधी**

तालुक्यातील नाव्हा गावाजवळील वरुड येथे मल्चिंग पांगविण्यासाठी शेतात गेलेल्या वडिलांसह दोन मुलांचा विजेचा जोरदार धक्का लागून मृत्यू झाला. विनोद तुकाराम म्हस्के (वय ३०), श्रध्दा (वय १२) व समर्थ (वय ८) अशी दुर्दैवी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. ही घटना आज (दि.१०) सकाळी घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरुड येथे आज सकाळी विनोद म्हस्के हे शेतात मल्चिंग पांगविण्यासाठी गेले होते. यावेळी शेतात पडलेल्या विजेच्या तारेला ते चिटकले. यावेळी जवळच खेळत असलेल्या श्रध्दा व समर्थ या त्यांच्या दोन मुलांना वडिलांना विजेचा धक्का



लागल्याचे लक्षात आले. ते दोघे वडिलांना पाणी पाजण्यासाठी गेले असता त्यांनाही विजेचा धक्का लागला. यात तिघांचाही मृत्यू झाला.

यावेळी विनोद म्हस्के यांची पत्नी मनिषा हिने आरडा ओरड केल्याने परिसरातील शेतकर्यांनी घटनास्थळी धाव घेत वीज पुरवठा खंडित केला. तिघांना रुग्णालयात नेले. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. विनोद म्हस्के यांचे साडू कैलास देवीदास जाधव यांनी पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# चौसाळा ते सात्रा-पोत्रा बस सेवा चालू करण्याची आगारप्रमुखांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असुन शाळाही काही दिवसांत च चालू होणार आहेत. त्या मुळे प्रवासी वाहतूक व विद्यार्थ्यांना शाळेत येण्याजाण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागेल याच कारणात्सव ग्रामपंचायत कार्यालय सात्रा - चांदणी व परिसरातील जनतेच्या वतीने चौसाळा ते सात्रा - पोत्रा हि कोरोणा काळापासून बंद असलेली बस सुरू करण्याची मागणी बीडच्या बस स्थानक आगारप्रमुखांकडे करण्यात आली आहे.**

या विषयी सविस्तर माहिती अशी की, मागील काही दिवसा पासून म्हणजे च कोरोणा काळापासून चौसाळा ते सात्रा पोत्रा बस सेवा बंद करण्यात आली आहे. बीड ते नांदूर सात्रा - पोत्रा मार्गे बसगाडी च्या नियमितपणे फे-या होत्या, त्या कोरोना काळापासुन होत नाहीत. आता १६ जून पासून शाळा सुरु होत आहेत. शाळेतील मुलांची व वयोवृद्ध अबाल प्रवासाची गैरसोय होत असल्या कारणामुळे चौसाळा ते सात्रा- पोत्रा बस सेवा ही सुरू करावी सात्रा- पोत्रा बस सकाळी चौसाळा येथे ०८:३० वाजता असावी व दुपारी शाळा सुटण्याच्या वेळेमध्ये ०५ वाजता बस चौसाळा स्थानकावर येथे असावी म्हणजेच जेणेकरून विद्यार्थी व जनतेचे गैरसोय होणार नाही. याची नोंद आगारप्रमुखांनी घेऊन तात्काळ सर्व सामान्य जनतेचा व विद्यार्थ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या मागणीकडे गांभीर्याने विचापुर्वक लक्ष देऊन त्वरीत मागणी पुर्ण करावी असे ग्रामपंचायत च्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे ग्रामपंचायत कार्यालय सात्रा चांदणी चे सरपंच पद्माकर काळे व ग्रामसेवक वाघमारे साहेब यांच्या स्वाक्षरी सह परिसरातील जनतेच्या वतीने बीड बसस्थानकाचे आगार प्रमुखांकडे केली आहे.

# चिंता करू नका चिंतामुक्त जीवन जगा-ह.भ.प.इंदुरीकर महाराज



**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

हसत-हसत जीवन जगा, आनंदी रहा, चिंता करू नका, चिंतामुक्त जीवन जगा, आनंदा इतकी पवित्र जागा कुठे विश्वात नाही असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केले.

बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथील शहीद जवान नवनाथ बहिरवाळ यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त सोमवार दि.९ रोजी महाराष्ट्रातील समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे अमृततुल्य कीर्तन आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प.शांतीब्रह्म भक्तीदास महाराज शिंदे, लक्ष्मण महाराज मेंगडे, ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, तुकाराम महाराज, राम महाराज डोंगर, सहदेव महाराज शास्त्री, बबन महाराज मंझेरीकर, नाना महाराज कदम, दत्ता महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. किर्तन सांगताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, जोपर्यंत गाव आहे तोपर्यंत गावातील चौकाला शहिदांचे नाव राहणार. तरुणांनी व्यसन करू नका, व्यसनमुक्त रहा, मोर्चे आंदोलने करू नका. दारुड्याने गावाचा नाश केला भांडे विकून काही जण दारू पेले आतापर्यंत गरिबांची लेकरं व्यसनाधीन होऊन गेले श्रीमंतीची नाही. जो मुलगा शहीद झाला त्याच्या आईचे आणि गावाचे नाव अमर झाले. खिशात पैसे आहेत तोपर्यंत लोक तुम्हाला विचारतील त्यानंतर कोणी विचारणार नाही पैसे संपले की तुम्ही संपले. इंद्रियावर ताबा ठेवा ताबा सुटला तर विषय संपला. हरिपाठ आणि काकडा केल्यानंतर जिवंतपणे मोक्ष मिळतो. हरिपाठा सारखा सूत्रबद्ध कोणता ग्रंथ नाही. ज्याचे मित्र


◀◀ पान ३ वर

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा -प.पूज्य प्रदीप मिश्राजी

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**देव हा देवच आहे, तो लहान किंवा मोठा नसतो, देवाची भक्ती ही भक्तीच असते ती कोणत्याही देवाची असली तरी चालते. नामस्मरणात मानवी जीवनाला सुख मिळत असते. त्यामुळे देवात भेद न करता देवा समान आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्ला परमपूज्य प्रदीप मिश्राजी यांनी दिला.**

चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महा न संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित शिवपुराण कथेत प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, आपल्या आयुष्याच कल्याण करायचं असेल तर कोणीही देवा देवात भेद भाव करू नये. शिव श्रेष्ठ की विष्णु श्रेष्ठ हा भेद करू नये, माझा देव श्रेष्ठ दुसरा कनिष्ठ असा भेद करू नये. माझा मंत्र श्रेष्ठ त्याचा कनिष्ठ असा भेद करणे चुकीच आहे. तुम्हाला देव पाहायचा असेल तर खरा देव तुमच्या घरात आहे आई वडिलच तुमचा देव आहे आई वडिलांची सेवा हि जगातील सर्वात श्रेष्ठ देवाची सेवा आहे. आई वडील यांची सेवा करा शिव महादेव काहीही कमी पडू देणार नाही. देव आणि भक्ती हा संबंध जवळचा असून भक्ती केली तर देव मिळतो देव आहे त्यामुळे भक्ती केली पाहिजे श्रेष्ठ कनिष्ठ





**करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प.पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले**

असा देवा त भेद करू नये भक्ती मध्ये मोठी शक्ती असून मानवी जीवनाच्या सुखासाठी नामस्मरण करणे गरजेचे आहे. देवाच्या भक्ती बरोबरच आई-वडिलांची सेवा केल्यास मानवी आयुष्यात सर्वांना सर्व काही मिळेल एवढी ताकद देवामध्ये आहे त्यामुळे देवाची भक्ती आणि आई-वडिलांची सेवा केलीच पाहिजे असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी केले. यावेळी राज्यभरातून आलेले लाखो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान मंगळवारी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले.

## २४ तास महाप्रसाद

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपा आशीर्वादाने व तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा कार्यक्रमास आलेल्या लाखो भाविक भक्तांना २४ तास महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांना गेली अनेक वर्षे पासून महाप्रसादाची व्यवस्था माऊली दादाच्या कृपा आशीर्वादाने अविरत सुरू आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पाणी प्रश्न, खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त धानोरी लोहगाव परिसरातील नागरिकांचे महापालिकेत आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

धानोरी लोहगाव परिसरातील नागरिक महापालिकेकडे करोडो रुपयांचा कर भरत आहेत. पण त्यांना शुद्ध पाणी, चांगले रस्ते स्वच्छता यासारख्या मूलभूत सुविधांपासून देखील वंचित राहावे लागत आहे. वारंवार अर्ज विनंती करूनही त्याची दखल घेतली जात नसल्याने या विरोधात आज धानोरी, लोहगाव रेसिडेंट असोसिएशन तर्फे पुणे महापालिकेच्या दारात निदर्शने करण्यात आली.

शहराच्या पूर्व भागातील वेगाने विकसित होणारी उपनगरे म्हणून धानोरी, लोहगाव यांच्याकडे पाहिले जाते. अनेक मोठे बांधकाम प्रकल्प या भागात होत आहेत. लोकसंख्या देखील सुमारे पाच लाखाच्या जवळपास गेलेली आहे. पण या भागातील नागरिकांना सुख सुविधा पुरविण्यात महापालिका दुर्लक्ष करत आहे या भागातील सोसायट्यांना दर महिन्याला टँकर साठी किमान पाच ते सहा लाख रुपये खर्च करावे लागत आहे. रस्त्यांना दोन-तीन फुटाचे खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघात होऊन अनेक जण जखमी झाले आहेत. त्याचप्रमाणे रुग्णवाहिकांना देखील अडथळा होत आहे. याबाबतच्या तक्रारी क्षेत्रीय कार्यालयाला वारंवार केल्या. पाणी पुरवठा, पथ विभागाकडे सुविधा मिळवण्यासाठी पाठपुरावा केला पण अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जात नाही.




धानोरी, लोहगाव रेसिडेंट असोसिएशन यापूर्वी चार वेळा धानोरी लोहगाव परिसरात आंदोलने केलेली आहेत. पण महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत या नागरिकांचा आवाज पोहोचत नसल्यामुळे आज पुणे महापालिकेच्या समोर आंदोलन करण्यात आले.

असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश जैवळ म्हणाले धानोरी, लोहगाव परिसरात साडेचारशे सोसायटी आहेत. या सर्व सोसायट्यांना टँकरनेच पाणी मागवावे लागत आहे. प्रत्येक सोसायटी महिन्याला पाच ते सहा लाख रुपये खर्च करते, वर्षभरात शेकडो कोटी मध्ये फक्त पाण्यावर पैसे खर्च करावे लागत आहेत.

त्यामुळे मेंटेनन्स मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आज महापालिका भवनासमोर निदर्शने करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप चंद्र यांना या संदर्भातले निवेदन देऊन समस्या सोडवण्याची मागणी केली आहे. असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रसन्न पाटील म्हणाले, खड्ड्यामध्ये अजून एका मुलाला २२ टाके पडले आहेत. अशा प्रकारचे अनेक अपघात पोरवाल रस्ता, भारत माता चौक, निरगुडी रस्ता, मैत्री पार्क यासह अनेक भागात रस्त्यांवर मोठमोठे खड्डे आहेत. पण महापालिका प्रशासन याकडे लक्ष देत नाही, मग आम्ही कर कशासाठी भरायचा असा प्रश्न पाटील यांनी केला.

# १२ वर्षीय प्रशिक्षणार्थी नेमबाज मुलीवर अत्याचार; खेळाडू व्यवस्थापकास सक्तमजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

बालेवाडी येथील शुटिंग अकादमीमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण घेत असलेल्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणार्या खेळाडू व्यवस्थापकास न्यायालयाने तीन वर्षे सक्तमजुरी आणि सात हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. रुद्र गौडा चनवीर गौडा पाटील (वय २८, रा. साई चौक, पाषाण. मूळ रा. बेळगाव, कर्नाटक) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. विशेष न्यायाधीश आर. एन. हिवसे यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला. दंडाची रक्कम न भरल्यास दोन महिने अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने मंगळवारी (दि.१०) निकालात नमूद केले.

पिडीता ही जन्माने अमेरिकन असून तिचे वडील भारतीय आहेत. उन्हाळी सुट्यांमध्ये पिस्तूल नेमबाजी शिकायची इच्छा असल्याने तिच्या आईने तिला पुण्यातील बालेवाडी



येथील शूटिंग अकादमीमध्ये प्रवेश घेतला होता.खेळाडू व्यवस्थापक या पदावर काम करत असलेल्या रुद्र गौडा पाटील या नराधमाने १४, १५ व २० मे २०१९ रोजी पिडीतेवर अत्याचार केला. याबाबत पिडीतेने आईला सांगितले. त्यानंतर २० मे २०१९ रोजी पिडीतेच्या आईने अकादमी गाठत वरिष्ठांना याबाबत सांगितले. यावेळी वरिष्ठ अधिकार्यांनी आरोपीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. परंतु, त्याच्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने पिडीतेच्या आईने अकादमीला ई-मेलद्वारे कळविले.

त्यानंतर दुसर्या दिवशी पिडीतेच्या आजीने हिंजवडी पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द तक्रार दिली. त्यानंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील प्रेमकुमार अग्रवाल व मूळ फिर्यादीतर्फे ॲड. पुष्कर पाटील व ॲड. मयूर धाटावकर यांनी काम पाहिले. यामध्ये सरकार पक्षातर्फे सहा साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पिडीत मुलगी व अकादमीमधील अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. दरम्यान, पिडितेला बंदुक व्यवस्थित धरता येत नसल्यामुळे आरोपी तिला ओरडला होता. म्हणून तिने खोटी केस केली असल्याचा बचाव आरोपीने केला. पिडीतेला आरोपीविरुध्द खोटा गुन्हा दाखल करण्यासाठी कोणतेही कारण नसल्याचे ॲड. अग्रवाल यांनी न्यायालयास कागदपत्रांआधारे दाखवून दिले. तसेच आरोपीचे आरोप बनावट असल्याचे ॲड. अग्रवाल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला शिक्षा सुनावली.

# प्रदेशाध्यक्ष पदाच्या जबाबदारीतून मुक्त करा, नव्या चेहऱ्याला संधी द्या-जयत पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

पक्षाने मला सात वर्षे प्रदेशाध्यक्ष पदाची संधी दिली. त्यामुळे आता तरुण चेहऱ्याला संधी द्या, अशी मागणी पक्षाच्या २६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी करताच एकच हलकल्लोळ झाला. त्यावर राजीनाम्याची घाई करु नका, कार्यकर्त्यांची भावना लक्षात घेत हा निर्णय आपण सर्वानुमते घेऊ, अशी भूमिका पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी मांडली.




राष्ट्रवादी काँगेसचे दोन पक्षांत विभाजान झाल्यानंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्या वतीने पुणे शहरात एकाच वेळी दोन वेगळे वर्धापनदिन सोहळे साजरे करण्यात आले. दोन्ही पक्षांच्या वतीने शक्तीप्रदर्शन पाहावयास मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा २६ वा वर्धापनदिन सोहळा पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात झाला. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गहिवरलेल्या स्वरात मागणी केली की, मला पक्षाने सात वर्षे प्रदेशाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी दिली. मला या जबाबदारीतून मुक्त करावे, नव्या चेहऱ्याला संधी द्या. यावर सभागृहात कार्यकर्ते जागेवर उभे राहून राजीनामा देऊ नका, साहेब तुम्हीच या पदावर रहा, असे ओरडून सांगू लागले. त्या वेळी पुन्हा जयंत पाटील कार्यकर्त्यांना म्हणाले, पक्ष शरद पवार साहेबांचा आहे. त्यांना निर्णय घेऊ द्या. तो मला मान्य राहील. त्यानंतर कार्यकर्ते शांत झाले.

या मेळाव्यात सर्वात शेवटी पक्षाध्यक्ष शरद पवार भाषणासाठी उभे राहिले. त्यांनी जयंत पाटील यांच्या मागणीचा उल्लेख सुरुवातीलाच केला. ते म्हणाले, कार्यकर्त्यांची भावना मला दिसली. तुम्ही पद सोडू नये, अशी त्यांची मागणी दिसत आहे. त्यामुळे घाईने निर्णय घेऊ नका, हा निर्णय आपण सर्वानुमते घेऊ.हाच धागा पकडून पक्षाच्या कार्याध्यक्षा व खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आपल्या पक्षात लोकशाही आहे. आठही खासदार, आमदार आणि कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार केला जाईल. आपण लोकशाही मार्गाने हा निर्णय घेऊ.

# शस्त्र परवान्यासाठी बनावट भाडेकरार करुन फसवणूक केल्याप्रकरणी सुशील हगवणेला न्यायालयीन कोठडीत

**पुणे । प्रतिनिधी**

शस्त्र परवान्यासाठी बनावट भाडेकरार तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी कोथरूड पोलिसांनी सुशील राजेंद्र हगवणे (वय-२८, रा. पौड रस्ता, कोथरूड; मूळ रा. भूकुम, ता. मुळशी) याला अटक केली. न्यायालयाने त्याची आज न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.



याबाबत पोलिस हवालदार मंगेश शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील पल्लवी काशिद यांनी युक्तिवाद केला. आरोपी सुशील हगवणे याने प्रत्यक्षात त्या ठिकाणी वास्तव्य नसतानाही, पौड रस्त्यावरील एका पत्त्यावर बनावट भाडेकरार तयार करून शस्त्र परवान्यासाठी अर्ज केल्याचे समोर आले. पोलिसांच्या तपासात ही बाब उघडकीस आली.

आरोपी सुशील हगवणे हा आत्महत्या केलेल्या वैष्णवी हगवणे यांचा दीर असून, त्या प्रकरणातही तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या परवानगीने पोलिसांनी त्याला या नव्या प्रकरणात अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास कोथरूड पोलिस करीत आहेत.

# खडकीच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा

**खडकी । प्रतिनिधी**

खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ वरिष्ठ महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पुढील दहा वर्षांसाठी स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. ही माहिती संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी दिली.

१९१३ मध्ये स्थापन झालेल्या खडकी शिक्षण संस्थेने १९८३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष ड. एस. के. जैन आणि चिटणीस स्व. ड. चंद्रकांत छाजेड यांच्या प्रयत्नांनी टिकाराम जगन्नाथ वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना केली. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमध्ये कार्यरत असलेल्या या महाविद्यालयाने नुकताच माणिक महोत्सव साजरा केला, असे





गोयल यांनी सांगितले.

संस्थाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास साधण्यात आला आहे. स्वायत्त दर्जामुळे या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी. डेटा सायन्स, बी.एस्सी. इंटेरियर डिझाईन, बी.एस्सी. सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल फॉरेन्सिक, बी.एस्सी. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, बी.एस्सी. निमेशन, बी.ए. इन सिव्हील सर्व्हिसेस आणि बी.ए. इन नाट्यशास्त्र हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी दिली. या प्रसंगी सचिव आनंद छाजेड, उपप्राचार्य प्रा. महादेव रोकडे, डॉ. सुचेता दळवी, प्रा. राजेंद्र लेले, प्रा. जुगल नाईक, डॉ. निलेश काळे, डॉ. अविनाश कोल्हे, परीक्षा विभागप्रमुख डॉ. डी. एम. मुपडे, डॉ. नागेंद्र जंगम, डॉ. प्रकाश पांढरपिसे, डॉ. महेश बेंडभर आणि कार्यालय अधीक्षक लक्ष्मण डामसे उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कट्टर धर्मवाद मान्य नाही अन् भविष्यातही असणार नाही-अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा पक्ष आहे. सत्ता येईल आणि जाईल, पण पुरोगामी विचार जिवंत राहिले पाहिजेत. आपल्या सगळ्यांच्या अधिकारांचे रक्षण होणे गरजेचे आहे. विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाण्याची क्षमता असेल त्यालाच राष्ट्रवादी कॉग्रेस संधी देणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कट्टरधर्मवाद मान्य नाही आणि भविष्यातही मान्य असणार नाही. शोषित, वंचित, मागासवर्गीय तसेच अल्पसंख्यांक समाजासाठी काम करणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राहिला आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात



अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले, मला आजही १० जून १९९९ हा दिवस आठवतो. शरद पवार आणि इतर काही मान्यवरांनी एकत्र येत राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत पक्षाने कधीही मागे वळून पाहिलं नाही. आपल्या पक्षाला कधीही बहुमत मिळालं नाही. आपल्याला नेहमीच सत्तेत सहभागी व्हावं लागलं. कारण आधीपासूनच राजकारणाची अशी परिस्थिती निर्माण झाली की एका पक्षाची सत्ता येण्याचे दिवस संपले आहेत. कारण केंद्रात देखील कुणाला यूपीए किंवा कोणाला एनडीए अशी आघाडी आणि युती करावी लागल्याची परिस्थिती देशाने पाहिली आहे.

भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) बरोबर जाण्याचा प्रयत्न २०१४ पासून सुरू होता. त्याबाबत दोन ते तीन वेळा अंतिम निर्णय देखील झाला होता. मात्र त्यानंतर भूमिका बदलण्यात आली. काँग्रेसचे सरकार असताना २६/११ चा हल्ला झाला. त्यावेळी पंतप्रधान मनमोहन सिंग होते. तर शरद पवार मंत्रिमंडळात होते. त्यावेळी दहशतवाद्यांवर काहीही कारवाई झाली नाही. पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. २६ नागरिकांना धर्माच्या आधारावर हत्या करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत काय करू शकते हे करून दाखविले, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

# वाघ्या श्वानाच्या समाधी वादावरून संभाजी ब्रिगेडला पुणे व रायगड पोलिसांची नोटीस

पुणे । प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ पुरुषोत्तम खेडेकर यांना नजरकैदेत ठेवणारी व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास कारवाईचा इशारा देणारी नोटीस पुणे येथील कोरेगाव पार्क पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक व रायगड पोलीस अधिक्षक यांनी खेडेकरांना दिली आहे. मात्र, खेडकर यांनी वकिलांमार्फत नोटीशी ला कायदेशीर उत्तर देताना 'पोलीसांची ही कृती म्हणजे लोकशाहीतील मुस्कटदाबी असून. कारण नसताना जाणीवपूर्वक नोटीस पाठविण्यास आली असल्याचे म्हटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडावरील समाधी शेजारी असलेल्या 'वाघ्या' श्वानाच्या समाधीवरून सुरू असलेला वाद आता अधिकच पेटत चालला आहे. या संदर्भात कोरेगाव पार्क पोलीस ठाणे पुणे व रायगडचे पोलीस अधीक्षक यांनी संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ पुरुषोत्तम खेडेकर यांना 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये' बजावलेल्या नोटीस मध्ये म्हटले आहे की, किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी शेजारी वाघ्या श्वानाची समाधी आहे. या समाधीचा पुतळा दिनांक ३१ मे रोजी अखेरपर्यंत काढण्यात यावा,



अशी भूमिका छत्रपती संभाजीराजे यांनी घेतली होती. या भूमिकेला संभाजी ब्रिगेडने पाठिंबा दिला असून, 'वाघ्या श्वानाची समाधी संभाजी ब्रिगेड काढणार' अशा आशयाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत पोलिसांनी ही नोटीस बजावली आहे. नोटीसमध्ये सौरभ पुरुषोत्तम खेडेकर आणि त्यांच्या संभाजी ब्रिगेड संघटनेच्या सदस्यांना स्पष्टपणे सूचित करण्यात आले आहे की किल्ले रायगडावर कोणत्याही प्रकारचे दखलपात्र स्वरूपाचे कृत्य घडवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी सौरभ पुरुषोत्तम खेडेकर यांच्यावर असेल. तसेच, त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. ही नोटीस भविष्यात न्यायालयामध्ये पुरावा म्हणून वापरण्यात येईल, असेही यात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, सौरभ खेडकर यांनी अँड मिलिंद पवार यांच्यामार्फत पोलिसांना कायदेशीर उत्तर पाठविले असून, ही पोलीसांची कृती म्हणजे लोकशाहीतील मुस्कटदाबी असून. कारण नसताना जाणीवपूर्वक नोटीस पाठविण्यास आली असल्याचे उत्तरात म्हटले आहे. आमच्या नावावर दुसरे कोणीतरी गैरप्रकार करणार व आम्हाला दोषी धरणार हा नोटीशी मागचा व्यापक कट असू शकतो असे ड. मिलिंद पवार यांनी आपल्या नोटिशीच्या उत्तरात म्हटले आह

# पोटातून काढली १३ किलोची गाठ, माळशिरसमधील महिलेला मिळालं जीवदान

**पुणे । प्रतिनिधी**

काळेवाडी रहाटणी परिसरातील स्पर्श हॉस्पिटलमध्ये एका महिलेच्या पोटातून तब्बल १३ किलो १५० ग्रॅमची गाठ काढून महिला रुग्णास जीवदान लाभले. याबद्दल सविस्तर माहिती अशी की, एक ३५ वर्षीय महिला सोलापूर-माळशिरस या भागातून स्पर्श हॉस्पिटल मध्ये नाव ऐकून दाखल झाली. तिला साधारणत एक वर्षापासून पोटाचा त्रास चालू झाला. कालांतराने त्रास वाढला.



गेल्या दोन महिन्यात पोटाचा घेर वाढणे, दम लागणे, चालताना धाप लागणे भूक न लागणे, पोटात् गैस होणे, पायांना सूज येणे इत्यादी तिने आजार अंगावर काढला, महिला स्पर्श हॉस्पिटल मध्ये दाखल झाल्यानंतर सर्व तपासणी नंतर दिनांक २१ मे रोजी चार तासाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडली.

किडनी सडल्यानंतर शरीराच्या 'या' अवयवांना येते सूज, शरीराचे होईल गंभीर नुकसान

शल्य चिकित्सक सर्जन डॉ. अशोक लांडगे व भूलतज्ज्ञ डॉ. बी. दिलीप मेहता डॉ. आदित्य बसवनाथे, डॉ सोपान क्षीरसागर, डॉ. सोमनाथ निकम, डॉ आशिष तायडे डॉ. ऋषी भाकरे आदी सहकारी होते. शस्त्रक्रिया यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी ही प्रदीप तावरे, डॉ. स्नेहल लांडगे तसेच रोशन सावंत ऑपरेशन थिएटर कर्मचारी यांनी सहकार्य लाभले.

आतापर्यंत हॉस्पिटलमध्ये डॉ. लांडगे यांनी ५ ते ६ किलो पर्यंतच्या गाठीची हास्वक्रिया यशस्वीपणे केलेल्या असून प्रथमतःच १३ किलोपर्यंत वजनाच्या गाठीची दुर्मीळ शस्त्रक्रिया करण्यात आली. आज पर्यंत डॉ. अशोक लांडगे यांनी हजारो शस्त्रक्रिया केल्या आहेत. स्पर्श हॉस्पिटलमध्ये सर्व शस्त्रक्रिया पोटाच्या दुर्बिणीवाटे मुत्ररोग, मुतखडा, कॅन्सर-केमोथेरपी हाडाबी जॉईट रिफ्रेसमेंट शस्त्रक्रिया माफक दरात केल्या जातात. त्यासाठी लागणारे अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, तज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध असते.

# करडे-न्हावरे रस्त्यावर भीषण अपघात, वडिलांचा मृत्यू

**निमोणे । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील करडे-न्हावरे रस्त्यावर शनिवारी (दि. ८ जून २०२५) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात ५३ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. धडक देणारा अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.बाळासाहेब रंगनाथ थोरात (वय ५३, रा. निमोणे, ता. शिरूर) असे मृत व्यक्तींचं नाव आहे. या प्रकरणी बाळासाहेब थोरात यांचा मुलगा शुभम बाळासाहेब थोरात (वय २८ रा. निमोणे, ता. शिरुर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अपघाताच्या दिवशी वडील बाळासाहेब थोरात हे एम एच १२ एन एन ३६०२ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन करडे गावातील चौकातुन न्हावरे रोडने घरी येत असताना समोरुन आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांच्या डोक्याला, छातीला आणि पायाला गंभीर दुखापत झाली.

या अपघातात बाळासाहेब थोरात यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या मोटारसायकलचेही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, धडक दिलेल्या अज्ञात वाहनचालकाने मदत न करता घटनास्थळावरुन वाहन घेऊन पळ काढल्यामुळे समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. शिरुर पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस हवालदार पवार हे करत आहेत. करडे येथील स्थानिक नागरिकांनी अपघाताबाबत कोणतीही माहिती असल्यास शिरुर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पुण्यात कोरोना रुग्णसंख्येत वाढ! तज्ज्ञांच्या बैठकीत आयुक्तांनी दिल्या महत्वाच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

देशभरातील कोरोना रुग्णांची संख्या वाढताना पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातही कोरोना रुग्णांची सख्या वाढत आहेत. राज्यात कोरोनाचा धोका वाढला असून सोमवारी एकूण ६५ नव्या कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे शहरात ४ नवे रुग्ण आढळून आले आहेत, त्यामुळे सर्वाधिक रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रात आढळून आले आहेत.

पुण्यातील सांडपाण्यात कोरोना विषाणूचा अंश सापडल्याची बातमी काही दिवसांपूर्वी आली होती. यामुळे एकच खळबळ उडाली होती. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाबाबत पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे, 'एनआयव्ही'व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) चे प्रतिनिधी, कोरोना कृतिदल सदस्य उपस्थित होते.




या बैठकीत सध्याच्या कोरोनाचा जो बदल झालेला विषाणू आहे, तो सौम्य असल्याची माहिती राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने एनआयव्हीने दिली आहे. ज्यांना सहव्याधी आहेत त्यांना काही लक्षणे दिसून येत असल्याचे देखील सांगण्यात आले. एनआयव्हीच्या प्रतिनिधींनी सध्याचा विषाणून सौम्य असल्याचे जनुकीय क्रमनिर्धानरणाद्वारे समोर आल्याचे सांगितले आहे. त्यानुसार आयुक्त नवल किशोर राम यांनी वयोवृद्ध व सहव्याधी असलेल्या रुग्णांबाबात योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्यात आतापर्यंत १७,२९२ कोरोना चाचण्या झाल्या असून त्यापैकी १ हजार ५०४ रुग्ण बाधित आढळले आहेत. यापैकी ८७३ रुग्ण बरे झाले असून त्यांना घरी पाठविण्यात आले आहे. आता सोमवार ९ जूनची कोरोनाबाधितांची आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये एकूण ६५ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. तर सर्वाधिक रुग्ण पुणे महानगरपालिका क्षेत्रात आढळून आले आहेत. सध्या पालिका हद्दीत ४ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. सद्यःस्थितीत राज्यात ६१३ सक्रिय रुग्ण आहेत.